ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्य् भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## घुसखोरांची समस्या भयाण!

भारत देश हा 'आयो-जावो घर तुम्हारा' असे झाले आहे. देशातील रोहिंग्या घुसखोरांच्या प्रकरणावर १६ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. यावेळी बेपत्ता रोहिंग्यांबाबत सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. पोलिसांच्या ताब्यात असलेले ५ घुसखोर रोहिंग्या अचानक बेपत्ता झाले आहेत. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. न्यायालयाने याचिकर्त्याला फटकारत केंद्र सरकारला नोटीस जारी करण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. देशातील रोहिंग्या घुसखोरांच्या प्रकरणावर येत्या १६ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. अशातच सर्वोच्च न्यायालयात आणखी एक याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेद्वारे मागणी करण्यात आली होती की बेपत्ता रोहिंग्या घुसखोरांप्रकरणी देखील १६ डिसेंबर रोजी एकत्रित सुनावणी घ्या. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली आहे. याचिकाकर्त्याने मागणी केली होती की सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस जारी करून बेपत्ता रोहिंग्यांबाबत उत्तर मागावे. मात्र, न्यायालयाने ही याचिका फेटाळली आहे. न्यायमूर्ती याचिकाकर्त्यांना म्हणाले, तुम्हाला माहिती आहे की ते (रोहिंग्या) घुसखोर आहेत आणि आपली उत्तरेकडील सीमा खूप संवेदनशील आहे. तुम्हाला चांगलंच माहिती आहे की देशात नेमके काय घडते आहे. तरीदेखील कोणी बेकायदेशीरपणे देशात येत असेल तर त्यांच्यासाठी आम्ही रेड कार्पेट अंथरून त्यांचे स्वागत करावे असे तुम्हाला वाटते का? असा संताप्तजन्य बाब समोर आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की रोहिंग्या भूयारी मार्गाने बेकायदेशीरपणे भारतात घुसतात आणि तुमची इच्छा आहे की आम्ही त्यांना जेवण द्यावे, त्यांना अन्न पुरवावे, राहायला जागा द्यावी, त्यांच्या मुलांना शिक्षण द्यावे. आम्ही त्यांच्यासाठी रेड कार्पेट अंथरावं का? आम्ही त्यांच्यासाठी अशा प्रकारचे कायदे करावेत अशी तुमची इच्छा आहे का? मुळात कोण आहेत रोहिंग्या? भारतात त्यांची संख्या किती? याचा विचार केला तर रोहिंग्या हे मूळचे म्यानमारच्या (बर्मा) रखाईन प्रांतातले रहिवासी असून मुख्यत्वे इस्लाम धर्मीय आहेत. १९८२ च्या नागरिकत्व कायद्याद्वारे म्यानमारने रोहिंग्यांचा नागरिकत्वाचा दर्जा संपुष्टात आणल्यापासून त्यांची ससेहोलपट होत आहे. म्यानमारने त्यांना देशातून हुसकावून लावण्याची मोहीम दशकभरापासून राबवली. त्यानंतर या रोहिंग्या शेजारच्या बांगलादेश, भारतासह अन्य देशांचा आश्रय घेतला आहे. २०२१ मध्ये म्यानमारमध्ये लष्करी बंडामुळे नागरी युद्ध भडकले आणि त्यामुळे तेथून होणारे स्थलांतर वाढले. सध्या बांगलादेशात सात ते आठ लाख रोहिंग्या असल्याचे मानले जाते. तर, भारतात ४० हजार रोहिंग्या असल्याचा मानवाधिकार संघटनांचा दावा आहे. त्यापैकी २० हजार जणांची संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार आयोगाकडे नोंद आहे. चाळीस हजाराचे रोहिंग्याची संख्येत वाढ झाली असेल. याची वरचेवर संख्येत वाढ होणे स्वाभाविक आहे. हा समाज कोठेही गेला तर लोकसंख्येत वाढ करणारा आहे हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे रोहिंग्याचा प्रश्न आज जरी मनावर घेतला नाही तर आगामी काळात याचे स्वरूप भयान होऊ शकते. ते नाकारू शकत नाही. मुळात आजही शेजारी राष्ट्रातील अनेक घुसखोर भारतात येत आहेत. लपून राहीले आहेत. याचा शोध भारत सरकार घेत नाही. एसआयआरच्या माध्यमातून अनेक काही उघड होणार आहेत. मुळात भारतात कडक यंत्रणा असताना घुसखोरी होते कशी? किंवा परदेशीयांना प्रवेश दिला जातो कसा? हा संशोधनाचा विषय आहे. भारतात पाकिस्तानी नागरिक काही कामा निमित्त आले व येथेच वास्तव्यास असतील तर मोठे संकट आपणहुन ओढाऊन घेत आहोत असेच आहे. भारतीयांनी सतत ब्रिटीशांची आठचण ठेवणे आवश्यक आहे. ब्रिटीश हे व्यापारी म्हणून आले व राज्यकर्ते बनले. तसेच घुसखोर हे एक-एक येतील व मोठ्या संख्याने साम्राज्य निर्माण करतील. अधिक त्यांच्या जाती-समाजाची संख्येत वाढ करून सत्ता हाती घेण्याची भीती आहे. त्यामुळे वेळीच सावध असले पाहिजे. देशात घुसखोरी मोठी समस्या आहे. त्यापेक्षा जे अवैधरित्या भारतात राहात आहेत. त्यांच्या शोध घेणे आवश्यक आहे. सर्वच न्यायालय किंवा पोलिस यंत्रणा करेल या नादात राहाण्यापेक्षा नागरिक म्हणून काही कर्तव्य पार पाडले पाहिजेत. घुसखोरांचा शिरकाव मोठे संकट आहे. ज्यावेळी महाराष्ट्रातून घुसखोरांना हाकलून देण्याचा विचार केला नंतर ही मोहीम मंदावली गेली. घुसखोर लपून असल्याने शोध घेणे आवघड आहे. म्यानमार मधून आलेले रोहिंग्यांस भारतात प्रवेश देणे चुकीचे ठरणारे होते. मुळात आश्रीत असणारे तर मालक म्हणून वावरत असेल तर वेळीच रोखणे कर्तव्य आहे. तसे पाहिले तर देशात अनेक विभागात विखुरलेले घुसखोर आहेत. सीमावर्ती भागात याची संख्या अधिक असण्याची शक्यता आहे. आसाम व प.बंगाला राज्यात तर घुसखोरीचे प्रमाण अधिक झाल्याचे उघड आहे. घुसखोर अधिक संख्याने अनेक वर्ष राहातात त्यांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या पायदेशी पाठविण्याची प्रक्रिया सतत असावी लागते. भारतातील नागरिकांशी लागेबांधे निर्माण करून भारतात राहाणारे हे कदापी भारतीय होवू शकत नाही. जे घुसखोर आहेत त्यांनी भारतीय रहीवाशी होण्यासाठी बनावट असे आधारकार्ड बनविल्याचे उघड झाले आहेत. अनेकाकडे बनावट आधारकार्ड सापडले आहेत. प.बंगालमध्ये असे प्रकार उघड झाले आहेत. त्यामुळे रोहिंग्याची समस्या मोठी आहे. वेळीच शोध घेतला नाही तर आणखीन एक समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे भारतीयांनी घुसखोरांना वेळीच रोखणे, शोध घेणे अपेक्षित आहे. नसता आगामी काळात मोठे संकट निर्माण होवू शकते.

### १४ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूर यार्डातील रेल्वे ओव्हरब्रिजच्या पाडकामामुळे

# सोलापूर रेल्वे विभागात घेण्यात येणारा ब्लॉक आणि रेल्वे वाहतुकीवर होणारा परिणाम




**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाच्या वतीने रविवार, १४.१२.२०२५ रोजी सोलापूर स्टेशन यार्ड मर्यादेत किमी ४५४/४-५ येथे रेल्वे ओव्हर ब्रिज सुपर स्ट्रक्चर आणि सब स्ट्रक्चरच्या जुन्या संरचनेचे पाडकामासाठी विशेष रेल्वे वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे.

रेल्वे प्रशासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या ब्लॉकमुळे गाड्यांच्या वेळात होणार बदल आणि त्याचा सविस्तर तपशील खलिलप्रमाणे: -

ब्लॉकचा दिवस आणि तारीख: रविवार १४ डिसेंबर २०२५
ब्लॉकची वेळ: सकाळी ०८:३० ते संध्याकाळी ०७:३० (११ तास)

मुख्य दिवशी (१४ डिसेंबर) रोजी खालील गाड्या रद्द राहतील :-

१. ट्रेन क्रमांक ११४१६ होसपेटे-सोलापूर एक्सप्रेस
२. ट्रेन क्रमांक ११४१८ सोलापूर-पुणे एक्सप्रेस
३. ट्रेन क्रमांक ११४१५ सोलापूर-होसपेटे एक्सप्रेस
४. ट्रेन क्रमांक ७१४५२ वाडी-सोलापूर डेमू
५. ट्रेन क्रमांक ०१४६१ सोलापूर-दौंड डेमू स्पेशल
६. ट्रेन क्रमांक ११४२१ हडपसर-सोलापूर डेमू
७. ट्रेन क्रमांक ०१४२५ दौंड-कलबुरगि डेमू स्पेशल
८. ट्रेन क्रमांक ०१४६५ सोलापूर-कलबुरगि डेमू
९. ट्रेन क्रमांक ०१४२६ कलबुरगि-दौंड विशेष

खालील गाड्या सूचित मार्गाने वळविल्या जातील (डायवर्जन)

१. ट्रेन क्रमांक १६५३५ म्हैसूर-पंढरपूर गोलगुंबज एक्सप्रेस हि दिनांक १३.१२.२०२५ रोजी हुब्बळ्ळि-लोंडा-मिरज-पंढरपूर मार्गे वळवण्यात येईल.
२. ट्रेन क्रमांक १६५३६ पंढरपूर-म्हैसूर गोलगुंबज एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी पंढरपूर-मिरज-लोंडा-हुब्बळ्ळि मार्गे वळवण्यात येईल.
३. ट्रेन क्रमांक ५७६६२ विजयपुरा-रायचूर पॅसेंजर हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी विजयपुरा-होटगी-वाडी मार्गे वळवली जाईल (होटगी-सोलापूर-होटगी सेवा बंद)
४. ट्रेन क्रमांक ५७६६१ रायचूर-विजयपुरा पॅसेंजर हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी वाडी-होटगी-विजयपुरा मार्गे वळवली जाईल (होटगी-सोलापूर-होटगी सेवा बंद)
५. ट्रेन क्रमांक १६३३२ तिरुवनंतपुरम सेंट्रल-सीएसएमटी मुंबई एक्सप्रेस हि दिनांक १३.१२.२०२५ रोजी गुंतकल-बल्लारी-होसपेटे -गदग-हुबळी-लोंडा-मिरज-पुणे मार्गे वळवण्यात येईल
६. ट्रेन क्रमांक ११३०२ बेंगळुरू-सीएसएमटी मुंबई उद्यान एक्सप्रेस हि दिनांक १३.१२.२०२५ रोजी गुंतकल-बल्लारी-होसपेटे-गदग-हुबळी-लोंडा-मिरज-पुणे मार्गे वळवण्यात येईल.
७. ट्रेन क्रमांक ११३०१ सीएसएमटी मुंबई-बेंगळुरू उद्यान एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी पुणे-मिरज-लोंडा-हुबळी-गदग-होसपेटे-बल्लारी-गुंटकल मार्गे वळवण्यात येईल.
८. ट्रेन क्रमांक १८५२० एलटीटी मुंबई-विशाखापट्टणम एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी कुर्डुवाडी-लातूर-लातूर रोड-खानापूर-विकराबाद मार्गे वळवली जाईल.
९. ट्रेन क्रमांक १२०२५ पुणे-हैदराबाद शताब्दी एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी कुर्डुवाडी-लातूर-लातूर रोड-बीदर-विकराबाद मार्गे वळवली जाईल.

शॉर्ट टर्मिनेशन

खालील गाड्या नमूद केल्याप्रमाणे शॉर्ट टर्मिनेशन होतील

१. ट्रेन क्रमांक १२१६९ पुणे-सोलापूर इंटरसिटी एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी कुर्डुवाडी पर्यंत धावेल
२. ट्रेन क्रमांक ११३१२ हसन-सोलापूर एक्सप्रेस हि दिनांक १३.१२.२०२५ रोजी कलबुरगि पर्यंत धावेल

शॉर्ट ओरिजिनेशन्स

खालील गाड्या नमूद केल्याप्रमाणे शॉर्ट ओरिजिनेशन होतील

१. ट्रेन क्रमांक १२१७० सोलापूर-पुणे इंटरसिटी एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी कुर्डुवाडी येथून सुटेल
२. ट्रेन क्रमांक ११३११ सोलापूर-हसन एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी कलबुरगि येथून सुटेल

रेगुलेशन्स

खालील गाड्या नियंत्रित केल्या जातील

१. ट्रेन क्रमांक १७३०८ बागलकोट-म्हैसूर बसवा एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी तिच्या निर्धारित वेळेच्या ३० मिनिटांनी पूर्ववत नियंत्रित केले जातील.

पुनर्निर्धारित (रिशेड्युल)

खालील गाड्यांचे नियमन केले जाईल

१. ट्रेन क्रमांक १६३८२ कन्याकुमारी-पुणे एक्सप्रेस हि दिनांक १३.१२.२०२५ रोजी सकाळी कन्याकुमारी येथून सकाळी ०८:४० ऐवजी २ तासांनी १०:४० वाजता सुटेल.
२. ट्रेन क्रमांक १६३८१ पुणे-कन्याकुमारी एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी पुण्याहून रात्री ११:४५ ऐवजी १ तासाने ००:४५ वाजता सुटेल.
३. ट्रेन क्रमांक ११०२० भुवनेश्र्वर-सीएसएमटी मुंबई कोणार्क एक्सप्रेस हि दिनांक १३.१२.२०२५ रोजी भुवनेश्र्वरहून दुपारी ०२:४० ऐवजी २ तासांनी सायंकाळी ०४:४० वाजता सुटेल.
४. ट्रेन क्रमांक ११०१९ सीएसएमटी मुंबई-भुवनेश्र्वर कोणार्क एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी सीएसएमटी मुंबईहून दुपारी ०२:०० ऐवजी २ तासांनी सायंकाळी ०४:०० वाजता सुटेल.
५. ट्रेन क्रमांक १२०२६ हैदराबाद-पुणे शताब्दी एक्सप्रेस हि दिनांक १४.१२.२०२५ रोजी हैदराबादहून दुपारी ०२:४० ऐवजी २ तासांनी सायंकाळी ०४:४० वाजता सुटेल.

ब्लॉकचा दिवस आणि तारीख: सोमवार १५ डिसेंबर २०२५
ब्लॉकची वेळ: सकाळी ११:१० ते दुपारी १:४० (२ तास ३० मिनिटे)

दुसऱ्या दिवशी (१५ डिसेंबर) रोजी खालील गाड्या रद्द राहतील :-

१. ट्रेन क्रमांक ११४१५ सोलापूर-होसपेटे एक्सप्रेस
२. ट्रेन क्रमांक ११४१६ होसपेटे-सोलापूर एक्सप्रेस
३. ट्रेन क्रमांक ११४१८ सोलापूर-पुणे एक्सप्रेस

रेगुलेशन्स :-

खालील गाड्या JCO १५.१२.२०२५ रोजी ३० मिनिटांनी नियंत्रित केल्या जातील

१. ट्रेन क्रमांक ५७६६१ रायचूर-विजयपुरा पॅसेंजर
२. ट्रेन क्रमांक ५७६६२ विजयपुरा-रायचूर पॅसेंजर
३. ट्रेन क्रमांक १२१६९ पुणे-सोलापूर इंटरसिटी एक्सप्रेस
४. ट्रेन क्रमांक १२१७० सोलापूर-पुणे इंटरसिटी एक्सप्रेस
५. ट्रेन क्रमांक २०९५३ चेन्नई सेंट्रल-अहमदाबाद एक्सप्रेस ९० मिनिटांनी नियंत्रित केल्या जातील

ब्लॉकचा दिवस आणि तारीख: मंगळवार आणि बुधवार १६ आणि १७ डिसेंबर २०२५
ब्लॉकची वेळ: दुपारी ०२:१० ते संध्याकाळी ०५:४० (३ तास ३० मिनिटे)

डायव्हर्जन :-

खालील ट्रेन JCO १६ आणि १७.१२.२०२५ नमूद केल्याप्रमाणे वळवल्या जातील

१.ट्रेन क्रमांक ५७६६२ विजयपुरा-रायचूर पॅसेंजर हि दिनांक १६.१२.२०२५ व १७.१२.२०२५ रोजी विजयपुरा-होटगी-वाडी मार्गे वळवली जाईल (होटगी-सोलापूर-होटगी सेवा बंद)
२. ट्रेन क्रमांक ५७६६१ रायचूर-विजयपुरा पॅसेंजर हि दिनांक १६.१२.२०२५ व १७.१२.२०२५ रोजी वाडी-होटगी-विजयपुरा मार्गे वळवली जाईल (होटगी-सोलापूर-होटगी सेवा बंद)

रेगुलेशन्स

१. ट्रेन क्रमांक १६३८२ कन्याकुमारी-पुणे एक्सप्रेस दिनांक १६.१२.२०२५ व १७.१२.२०२५ रोजी ३० मिनिटांनी नियंत्रित होईल.

दिवस आणि ब्लॉकची तारीख: गुरुवार आणि शुक्रवार १८ आणि १९ डिसेंबर २०२५
ब्लॉकची वेळ: सायंकाळी ०४:०० ते सायंकाळी ०७:३० (३ तास ३० मिनिटे)

रेगुलेशन्स

१. ट्रेन क्रमांक ११३११ सोलापूर-हसन एक्सप्रेस २० मिनिटांनी नियंत्रित केली जाईल.
२. ट्रेन क्रमांक १७३०८ बागलकोट-म्हैसूर बसवा एक्सप्रेस ४० मिनिटांनी नियंत्रित केली जाईल.

प्रवाशांना विनंती आहे की त्यांनी कृपया परिणामांची नोंद घ्यावी आणि त्यानुसार त्यांच्या प्रवासाचे नियोजन करावे.

# आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे लसूण तेल, सांधेदुखीच्या वेदना कमी करण्यासाठी घरीच बनवा

वाढत्या वयानुसार, बहुतेक लोकांना गुडघे आणि सांधेदुखीचा त्रास होतो. ही समस्या सामान्य वाटते, परंतु ही वेदना सहन करणे खूप कठीण आहे. अशा परिस्थितीत लोक सर्व प्रकारची औषधे आणि तेल वापरतात, परंतु ही वेदना सहजासहजी जात नाही.

अशा परिस्थितीत, घरी बनवलेले लसूण तेल सांधेदुखीपासून मुक्त होण्यासाठी खूप प्रभावी आहे. आरोग्य तज्ञ असेही म्हणतात की लसूण तेल सांधेदुखीपासून मुक्त होण्यासाठी खूप फायदेशीर आहे. चला जाणून घेऊया लसूण तेल बनवण्याची आणि वापरण्याची पद्धत..

आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे लसूण तेल, सांधेदुखीच्या वेदना कमी करण्यासाठी घरीच बनवा

लसूण तेल बनवण्याची पद्धत-

लसूण तेल बनवण्यासाठी, लसूणच्या १०-१२ पाकळ्या सोलून ठेचून २५० मिली मोहरीच्या तेलात घाला. यासोबत, २ जायफळ कुस्करून त्यात घाला. आता गुडुची (गिलॉय) च्या सुक्या देठाचे ५०-६० ग्रॅम लहान तुकडे करा आणि त्यात घाला. या सर्व गोष्टी मोहरीच्या तेलात घाला आणि १ तास मंद आचेवर शिजवत रहा. हे तेल शिजवल्यानंतर, ते थंड करा आणि गाळून बाटलीत ठेवा. आता तुमचे तेल तयार आहे. आता तुम्ही सांधेदुखीपासून आराम मिळवण्यासाठी दररोज हे तेल वापरू शकता.

लसूण तेल वापरण्याची पद्धत-

सांधेदुखीपासून आराम मिळवण्यासाठी, लसूण तेलाने ५-७ मिनिटे सांध्यांना मालिश करा. थंड तेल देखील फायदेशीर असले तरी, थोडेसे कोमट तेल वेदना आणि सूज लवकर कमी करण्यास प्रभावी आहे. दररोज रात्री झोपण्यापूर्वी सांध्यांना लसूण तेलाने मालिश करा. एका आठवड्यात तुम्हाला वेदनांपासून आराम मिळण्यास सुरुवात होईल.

लसूण हे वेदना कमी करणारे एक चांगले औषध आहे-

लसूण हे वेदना कमी करणारे एक चांगले औषध मानले जाते. आयुर्वेदातही लसूण खूप महत्वाचे आहे. खरं तर, लसूणमध्ये जीवनसत्त्वे, अँटी-बॅक्टेरियल, खनिजे आणि अँटीफंगल गुणधर्म असतात, जे अनेक आरोग्य समस्या दूर करण्यासाठी प्रभावी मानले जातात. कच्चा लसूण खाल्ल्याने केवळ सांधेदुखीची समस्या दूर होतेच, परंतु उच्च रक्तदाबाच्या समस्येपासून मुक्त होण्यास देखील मदत होते. त्याच वेळी, वाढलेले वजन नियंत्रित करण्यासाठी आणि दृष्टी वाढवण्यासाठी देखील कच्चा लसूण खूप फायदेशीर आहे.

# कृषि विषयक महत्वाचा लेख ५ डिसेंबर जागतिक मृदा दिन चला माती परिक्षण करुया आपली जमीन समृध्द करुया

जागतिक माती दिन अर्थात जागतिक मृदा दिन दरवर्षी ५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. मातीचे संवर्धन, सुपिकता तिच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण व्हावी, हा या दिवासाचा उद्देश आहे. मूलभूत जगण्यासाठी अन्नाची आवश्यता आहे. ती गरज मातीतून पिकणाऱ्या अन्न धान्यामुळे पूर्ण होते. जमिनीमधील मातीचे परिक्षण करुन योग्य पध्दतीने उत्पादन घेतले तर पिकांचे उत्पादन वाढेल. शेतातील माती निरोगी असेल तर समृध्द शेती होईल. त्यासाठी मातीचे परिक्षण करुन समृध्दता वाढविण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे तुम्ही जर शेतकरी आहात तुमच्याकडे जमीन आहे. तर तुम्ही माहिती परीक्षण केले पाहिजे, चला! आपली माती आणि तीची पत जाणून घेऊ या !

**मातीचे महत्व**

अन्न वस्त्र निवारा या मुलभूत गरजा माती शिवाय पुर्ण होवू शकत नाही. माती विना शेती होवूच शकत नाही त्यामुळे निरोगी माती ही समृध्द शेतीसाठी अत्यंत आवश्क आहे. मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानातून कितीही प्रगती साधली, तरी एकदा नष्ट झालेली माती पुन्हा निर्माण करता येत नाही, हे वास्तव आहे. १० सेंटीमीटर मातीचा थर तयार होण्यासाठी हजारो वर्षे लागतात त्यामुळे मातीचे महत्व खूप आहे.

**माती संवर्धन- काळाची गरज**

आरोग्यदायक माती हा आरोग्यदायक अन्न निर्मितीचा पाया आहे. पृथ्वीचा एक चतुर्थांश भाग विविध जीवांनी व्यापलेला असून ही जैवविविधता टिकवून ठेवण्यात मातीचा मोलाचा वाटा आहे. मातीमध्ये पाणी साठविण्याची आणि शुध्द करण्याची क्षमता आहे, तसेच पूर व दुष्काळ या सारख्या संकटालाही मातीमुळे मात मिळते. विविध वनस्पतींच्या लागवडीसाठी किंवा अन्न, वस्त्र (कापूस, ताग सारखे विविध धागे) इंधन आणि औषधी वनस्पतींच्या व्यवस्थेसाठी माती मूलाधार आहे. मातीतील विविध घटक कर्बचक्रात महत्वाची भूमिका बजावतात. वातावरणातील बदल सहन करणे आणि तो सौम्य करणे यासाठी माती सहाय्यभूत ठरते. जल व्यवस्थापन आणि पूर व दुष्काळ या आपत्तींना तोंड देवून परिस्थिती पूर्वपदावर आणण्यातही मातीतील विविध घटक महत्वाची भूमिका बजावतात. अन्न सुरक्षा आणि शाश्वत भवितव्य मातीवरच अवलंबून असल्याने मातीचे संरक्षण, शाश्वत संवर्धन काळाची गरज आहे.

**माती संवर्धन उपाय**

माती संवर्धनासंदर्भात उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कृषी विभाग २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२५ या कालावधीत मातीचे नमुने गोळा करण्याबाबत पंधरवडा मोहिम राबवित आहे. यानुसार राज्यातील १० लाख ८० हजार शेतकऱ्यांच्या मातीचे परिक्षण करुन जमीन आरोग्य पत्रिका वितरण करण्याचे निश्चित केले आहे. तसेच जिल्हा, तालुका, गावस्तरावर शेतकऱ्यांना जमिन आरोग्य पत्रिका वितरीत करुन जमिनीच्या आरोग्य विषयषक, माती परिक्षणाचे महत्व, जमीन सुपीकता निर्देशांक व जमिन आरोग्य पत्रिका आधारित खतांच्या संतुलित वापराविषयी, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, सेंद्रीय खत वापराचे फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

कृषी विभाग,जिल्हा परिषद, आत्मा यंत्रणा, कृषी विद्यापीठ, संशोधन संस्था, कृषी विज्ञान केंद्र, नोंदणीकृत खाजगी प्रयोग शाळा, कृषि विषयक संस्था इत्यादींच्या सहयोगाने जिल्ह्यांमध्ये ५ डिसेंबर रोजी मृद आरोग्याचे महत्व, सॉईल हेल्थ कार्ड, मोबाईल अॅपद्वारे मृद नमुने तपासणी केल्यावर जमीन आरोग्य पत्रिका आधारीत खतांचा संतुलित वापर याबाबत चर्चासत्रे, व्याख्याने कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले आहे.

**माती परीक्षणाचे फायदे**

मातीच्या संवर्धनासाठी माती परीक्षण करुन घेवून त्यानुसार उपयोजना केल्यास त्या फायदेशीर ठरतात त्यामुळे जमिनीतील उपलब्ध घटकांचे प्रमाण समजते. त्यावर आधारीत पिकांच्या गरजेप्रमाणे आवश्यक तेवढेच खत दिल्यामुळे आर्थिक बचत होते. जमिनीच्या प्रतीनुसार पिकांची निवड व नियोजन करता येते. खतांचा संतुलित वापर केल्यामुळे पिकांची वाढ चांगली होवून अधिक उत्पादन मिळते. जमिनीची सुपिकता आजमावता येते. जमिनीतीत काही दोष असतील तर ते देखील समजतात आणि दोषानुसार जमीन सुधारण्यासाठी नियोजनबध्द उपाययोजना करण्यात येतात.

**माती परीक्षण कसे करावे**

शेतकऱ्यांनी कागदावर लिहून तो कागद माती नमुन्याच्या पिशवीत टाकावा. १) माती नमुना क्रमांक २) माती नमुना घेतल्याची तारीख ३) शेतकऱ्याचे संपूर्ण नाव, ४) मोबाईल क्रमांक,५) गावपोस्ट, ६) तालुका, ७) जिल्हा, ८) सव्हे गट क्रमांक, ९) नमुन्याचे प्रातिनिधी क्षेत्र १०) जमीन प्रकार बागायत जिरायत, ११) मागील हंगामातील पीक जात, १२) पुढील हंगामातील पीक जात १३) मातीची खोली सें.मी.,१४) जमीनीचा उतार १५) जमीनीची काही विशेष लक्षणे-खारवट, चोपण,आम्ल व इतर १६) पाण्याचा निचरा बरा वाईट, १७) माती गोळा करणाऱ्याची सही घेवून मातीचे नमुने संबंधित गावातील कृषि सहायक कृषि पर्यवेक्षक मंडल कृषि अधिकारी यांच्या मार्फत किंवा शेतकत्यांनी स्वत: जिल्हा मृद चाचणी प्रयोग शाळेकडे वरील प्रमाणे माहिती भरुन पाठवावा.

**मातीचा नमुना केव्हा व कोठे घ्यावा ?**

मातीचा नमूना पिके काढल्यानंतर किंवा पेरणीपूर्वी (सेंद्रीय व रासायनिक खते देण्यापूर्वी) व खते दिल्यानंतर तीन महिन्यांनी घ्यावा. मातीचा रंग, जमिनीचा खडकाळपणा, उंच- सखलपणा, पिकातील फरक व बागायत जिरायत स्थिती लक्षात घेऊन त्याप्रमाणे शेतीचे वेगवेगळे भाग पाडावेत व त्या प्रत्येक भागाला विशिष्ट क्रमांक द्यावेत. प्रत्येक भागाचा वेगळा नमूना घेण्यात यावा.

खालील ठिकाणांहून मातीचे नमूने घेवू नयेत

गुरे बसण्याची व झाडाखालची जागा, खते व कचरा टाकण्याची जागा, दलदल व घराजवळची जागा, पाण्याच्या पाटाजवळील जागा, बांधाजवळचे क्षेत्र, झाडाझुडाचे क्षेत्र याठिकाणचे माती नमूने टाळावेत.

**जमीन सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना**

जमिनीचा चोपणपणा वाढत आहे. त्यासाठी उतारास समांतर चर काढून पाण्याचा निचरा होईल अशी काळजी घ्यावी. हेक्टरी ५ ते १० टन जिप्सम पूड व १५ ते २५ गाड्या चांगले कुजलेले खेणखत जमिनीत मिसळून घालवे. हिरवळीच्या खतासाठी ताग, धैंचा, शेवरी सारखी पिके घेऊन फुलावर येताच जमिनीत गाडावीत. भात, कापूस, गहू, शेवरी यासारखी पिके घ्यावीत. जमीनीच्या पृष्ठावर आलेले क्षार खरवडून शेताबाहेर टाकून द्यावे. जमिनीचे लहान वाफे करुन त्यात थोडा वेळ वाफा भरुन पाणी साठवून एकदम चरावाटे बाहेर काढून टाकावे, म्हणजे पाण्याबरोबर क्षार बाहेर जातील. सेंद्रीय खतांचा भरपूर प्रमाणात वापर करावा.क्षारास दाद देणारी पिके कांदा, भात, कापूस, सूर्यफुल, शेवरी सारखी पिके घ्यावीत. क्षार संवेदनशिल पिकांची लागवड करु नये,पिकांची लागण सरीच्या कुशीत करावी. क्षारास दाद देणारी पिके घ्यावीत व पिकांची नियमीत फेरपालट करावी. जास्त प्रमाणात सेंद्रीय व हिरवळीची खते वापरावीत.पिकास योग्य वेळी थोडे थोडे पाणी द्यावे.पाण्याच्या अतिवापरामुळे क्षारांचे प्रमाण वाढल्यास माती परिक्षणानुसार जिप्समची मात्रा ठरवून त्याचा वापर करावा. चांगल्या व मचुळ पाण्याचा एकत्रित वापर करावा.

वरील पध्दतींचा अवलंब करुन आपल्या शेतीचे आणि शेतीतील मातीचे योग्य पध्दतीने परीक्षण झाले पाहिजे. शेत जमिनीत खतांचा, पाण्याचा योग्य वापर, जमिनीला आवश्यक असणाऱ्या पिक पध्दतीचा वापर करुन शेतीची सुपिकता मातीची समृध्दता टिकवून उत्पादन वाढीसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

-रणजित पवार



# सुंदर मी होणार...

मागील लेखात आपण अंतरंग सौंदर्याचा विचार करत होतो. अंतरंग सौंदर्य म्हणजे अंतःकरणाचं सौंदर्य. अंतःकरण म्हणजे प्रामुख्यानं मन, बुद्धी आणि चित्त. अंतःकरणात प्रथम मनाचा विचार केला आहे. पंचज्ञानेंद्रियांनी जाणलेल्या कोणत्याही गोष्टीची, प्रसंगाची जाणीव सर्वप्रथम मनामुळे होते. मनाला त्याची जाणीव होते म्हणजे मनानं त्याची नोंद घेतली जाते.

मनातील जाणिवेनुसार भावना निर्माण होतात. या भावना सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारच्या असतात. आनंद, उत्साह, दया, करुणा, आदर, प्रेम, वात्सल्य, सहानुभूती, सौहार्द, मैत्री, आत्मविश्वास, व्यक्तीच्या गुणांविषयी कर्तृत्वाविषयी वाटणारं कौतुक, अभिमान इत्यादी सकारात्मक भावना आहेत. आपला अनुभव आहे की या भावना आपल्यात सकारात्मकता निर्माण करतात. या सुंदर भावना आहेत. याविरुद्ध क्रोध, संताप, द्वेष, असूया, कठोरता, क्रौर्य इत्यादी नकारात्मक भावना आहेत. या भावना त्या त्या क्षणी तात्पुरता जोम अंगात निर्माण करत असल्या तरी अंततः त्या आपल्याला दुःखच देतात. अशा भावना सगळ्याच गोष्टींमध्ये दोष शोधतात, नकारात्मकता पाहतात. सकारात्मक अर्थात सुंदर भावना सर्व गोष्टीत चांगुलपणा आणि सौंदर्य पाहायला शिकवतात. भावना मनात जागृत होण्याची प्रक्रिया इतकी वेगात घडत असते की आपल्याच मनात निर्माण झालेल्या भावनांची जाणीव आणि ओळख आपल्याला नसते. मनात निर्माण झालेल्या भावना ओळखता येणं हे भावनिक सौंदर्य वाढवण्याचं पहिलं पाऊल आहे. आपल्या मनातल्या भावना ओळखून त्यांना नियंत्रित करणे शक्य आहे. भावना नियंत्रित करणं म्हणजे पूर्णपणे थांबवणं नाही. भावना आपण जन्मतःच घेऊन आल्यामुळे कुठलीच भावना मनातून पूर्णपणे काढून टाकता येत नाही; परंतु कुठल्या भावनेचा उपयोग कसा आणि कधी करायचा हे मात्र प्रयत्नांनी ठरवता येतं. म्हणूनच भावनांचं नियंत्रण म्हणजे राग, द्वेषादी नकारात्मक भावना पूर्णपणे काढून टाकणं आणि भावनाशून्य होणं नव्हे, तर नकारात्मक भावनांची तीव्रता कमी करणं आणि त्यांना सकारात्मकतेकडे वळवणं. कुठल्याही घटनेवर, कोणाच्याही कृतीवर, बोलण्यावर पटकन प्रतिक्रिया न देता विचार करून प्रतिसाद देणं भावनांवर नियंत्रण आणलं तरच शक्य होईल. आपल्या मनातल्या भावना ओळखणारा आणि भावनांशी मैत्री केलेला मनुष्य लहान लहान गोष्टीत उत्तम आणि उदात्त पाहायला शिकतो.

**मी योगिनी : डॉ. वैशाली दाबके**

अनुभवांशी समरस होऊ शकतो. मनाच्या योगे आपल्या भावनांची ओळख करून त्यांचं सौंदर्य वाढवणं, त्यांचं उदात्तीकरण करणं शक्य आहे; परंतु यासाठी मन स्थिर व्हायला हवं. मन स्थिर आणि शांत करण्यासाठी प्राणायाम, प्रत्याहार आणि धारणा या अष्टांगयोगातील पायऱ्या अतिशय उपयुक्त आहेत. भक्तियोग, मंत्रपठण, नामस्मरण हेही भावनांना शांत करण्याचे प्रभावी उपाय आहेत.

बौद्धिक सौंदर्य – आपल्या आंतरिक व्यक्तिमत्त्वातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे बुद्धी. मनानं भावनांवर नियंत्रण आणता येतं. मनावर नियंत्रण आणायचं, तर बुद्धी आवश्यक आहे. मनापेक्षा बुद्धीची शक्ती अधिक आहे. निश्चय करणं हे बुद्धीचं महत्त्वाचं कार्य आहे. मनानं कितीही विकल्प समोर ठेवले तरी त्यातला कोणता निवडायचा किंवा निवडायचा की नाही हे बुद्धी ठरवते. थोडक्यात, विचार करणं, विचारांची निश्चिती करणं म्हणजे पक्की मत ठरवणं हे कार्य बुद्धी करते. बुद्धीच्या निर्णयावर भावना उद्दीपित होणं म्हणजे जागृत होणं तसेच त्यानंतर होणारं मनुष्याचं वर्तन आणि मनुष्याचं बोलणं अवलंबून असतं.मनुष्य जसे विचार करतो तशा भावना निर्माण होतात जशा भावना आणि विचार असतात तशी कृती होते आणि तसेच मनुष्य बोलतो. त्यामुळेच विचार सकारात्मक असतील, तर सकारात्मक भावना निर्माण होतील आणि आपोआप कृती आणि बोलण्यामध्येही ती सकारात्मकता प्रतीत होईल. बुद्धी, मन, भावना, कृती आणि उक्ती असा हा आंतरेंद्रियांपासून बाह्य इंद्रियांपर्यंत क्रम आहे. यांमध्ये समरसता आणि संतुलन असणं म्हणजे आंतरिक सौंदर्य.

वयंपाकाची भांडी आणि उपकरणे

आपल्याकडे जे आहे तेच आपण इतरांना देऊ शकतो या नियमानुसार ज्या व्यक्तीमध्ये आंतरिक सौंदर्य, सकारात्मकता असते ती व्यक्ती सर्वांमध्ये सौंदर्य पाहते. लहान लहान कृतींमध्ये, छोट्या छोट्या क्षणांमध्ये आनंद शोधते. त्यामध्ये इतरांनाही सहभागी करून घेते. सामान्य माणसाला सौंदर्यहीन वाटणाऱ्या गोष्टीतही अशा व्यक्तीला सौंदर्य दिसते.

एका मूर्तिकारानं एकदा सुंदर मूर्ती घडवली. मूर्ती पाहणारे त्याचं कौशल्य पाहून आश्चर्यचकित होत होते. एका व्यक्तीनं त्याला विचारलं, इतकी सुंदर मूर्ती तुम्ही कशी काय घडवलीत? त्यावर त्यानं उत्तर दिलं की मूर्ती या पाषाणात होतीच. मी फक्त नको असलेला भाग काढून टाकला. सामान्य माणसाला जो दगड आकारहीन वाटत होता त्यामध्ये मूर्तिकाराला सौंदर्य दिसत होतं. म्हणूनच म्हणतात ती सौंदर्य हे पाहण्याच्या दृष्टीवर अवलंबून असतं त्या वस्तूवर नाही. मात्र ही सौंदर्यदृष्टी विकसित करायची तर अंतःकरण शुद्ध, सकारात्मक विचारांनी आणि भावनांनी शिग-ोशीग भरायला हवं. यासाठी योग हा अतिशय प्रभावी उपाय आहे. मागील अनेक लेखात याविषयी सांगितलंही आहे.मनुष्य खरोखरच भाग्यवान आहे की, त्याला निसर्गानं बुद्धी विकसित करायचं, आपल्या भावना ओळ-खून त्यांना नियंत्रित करायचं व सकारात्मक करायचं, इतकंच नव्हे तर त्या भावनांना भाषा, कला, यांमधून आविष्कृत करायचं असामान्य सामर्थ्य दिलं आहे.मागील लेखात सांगितलेल्या गोष्टीप्रमाणे आपला अंतःकरण म्हणजे परिस आहे. मात्र या देवदत्त असामान्य देणगीची आपल्याला पुरेशी जाणीव नाही. त्यामुळे आपण त्याचा पुरेसा विकासही करत नाही.शरीराचं म्हणजेच बाह्य सौंदर्य महत्त्वाचं आहेच; परंतु याहीपेक्षा अंतरंगाचं सौंदर्य जीवनात अनेक सुखद रंग भरणार आहे. बाह्य सौंदर्याची छाप पहिल्या क्षणाला पडेल; परंतु फार काळ टिकणार नाही. वर्तनातून आणि बोलण्यातून अंतरंग सौंदर्याची पडलेली छाप ही नित्य टिकणारी असते. खरंतर सख्यांनो, आंतरिक सौंदर्य वाढू लागतं तसं तसं बाह्य सौंदर्यही उमलणाऱ्या फुलाप्रमाणे खुलायला लागतं. आंतरिक सौंदर्य खुलवायचं तर अंतरंग योगाशिवाय म्हणजे प्रत्याहार, धारणा, ध्यान यांशिवाय पर्याय नाही.

***

# स्मरणशक्ती सुधारण्यासाठी नियमित करा ह्या खालील गोष्टी

मेंदू आपल्या शरीरातील सर्वात महत्त्वाचा आवयव मानला जातो. मेंदू आपल्या शरीरातील सर्व आवयवांच्या क्रियांवर नियंत्रण ठेवते. त्यामुळे मेंदूचे आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते आणि तुमची स्मरणशक्ती सुधारम्यास मदत होते. तुमच्या आहारामध्ये काही विशेष गोष्टींचे समावेश करणे गरजेचे आहे. चला तर जाणून घेऊया तुमची बुद्धी तल्लख करण्यासाठी आणि मेंदू निरोगी ठेवम्यासाठी कोणत्या पदार्थांचे सेवन करावे?



स्मरणशक्ती सुधारण्यासाठी आणि बुद्धी तल्लख करण्यासाठी तुमच्या आहारात 'या' खास पदार्थाचे सेवन करा आजकालच्या काळात धावपळीची जीवनशैली, कामाचा ताण अशा गोष्टींमुळे लोकांना आरोग्य आणि आहाराकडे दुर्लक्ष होतं आणि अनेक आजार होऊ शकतात. त्यामुळे अनेकांना जंक फूजच्या सेवनाची चटक लागते आणि फास्ट फूड, जंक फूडवर ताव मारला जातो. मात्र जंक फूडच्या सेवनामुळे गंभार आजारांचा धोका वाढतो मेंदू हा आपल्या शरीरातील सर्वात महत्त्वाचा अवयव मानला जोता. आपल्या संपूर्ण शरीराचे नियंत्रिण आणि हालचाली मेंदूवर अवलंबून असतात. त्यामुळे तुमच्या मेंदूचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आहारात काही खास पदार्थांचा समावेश गरजेचा मेंदूचं आरोग्य निरोगी आणि चांगलं राहावं यासाठी तुमच्या आहारामध्ये काही विशेष पदार्थांचा समावेश गरजेचा आहे. बदाम, टोमॅटो, कढधान्य आणि हिरव्या पालेभाज्यांमुळे मेंदूचं आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते त्यासोबतच या पदार्थांमध्ये भरपूर प्रमाणात पोषक घटक असतात ज्यामुळे तुमच्या मेंदूचे आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते. निरोगी आहाराचे सेवन केल्यास तुम्हाला कोणत्याही प्रकारचे आजार होत नाहीत. साधं, पारंपरिक अन् मनाला आनंद देणारं जेवणसमंथाच्या लग्नाचा मेन्यू आला समोर; ताटात होता 'हा' खास पदार्थ मेंदूचे आरोग्य निरोगी ठेवण्यास 'या' पदार्थाचे सेवन करा **(क्रमशः उद्याच्या अंकात)**

# यमदूत आणि साथीदार



एका कुटुंबाला पूर्ण उद्ध्वस्त करणार्याला कठोर शिक्षा व्हायलाच हवी; पण कल्याणीनगरसारख्या प्रकरणात जेथे शासकीय रुग्णालयातील अधिकारीच आर्थिक तडजोडी करून खर्याचे खोटे करतात, तेथे वाजवी अपेक्षाही धाडस ठरते!

पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड परिसराची ख्याती पूर्वी सर्वांत सुरक्षित स्थळ, अशी होती. तो लौकिक पुन्हा मिळण्याची शक्यता सोडून दिली पाहिजे. वाहनचालकांमध्ये वाढलेली बेदरकार वृत्ती, सुरक्षित वाहतुकीवर लक्ष देण्याऐवजी 'सावज' शोधण्याकडे कल अस-लेले वाहतूक पोलिस, प्रादेशिक परिवहन विभागाच्या 'अर्थ'पूर्ण दुर्लक्षामुळे मस्तवाल झालेल्या खासगी बसमालकांच्या टोळ्या, हे पुणे, पिंपरी- चिंचवडमधील भयाण वास्तव. परिणामी रस्त्यांवर यमदूत मोकाट फिरत आहेत. हिंजवडीत तीन भावंडांचा झालेला मृत्यू हे याचे ताजे उदा-हरण. प्रत्येक संवेदनशील नागरिकासाठी हिंजवडीतील घटना चटका लावून जाणारी आहे. मद्यधुंद चालकामुळे तेथे अर्चना प्रसाद, प्रिया प्रसाद आणि सूरज प्रसाद या तीन भावंडांचे प्राण गेले. प्रसाद कुटुंबावर जो आघात झाला आहे त्याचे वर्णन करणे सर्वस्वी अशक्य ठरावे! ज्या बसमुळे अप-घात झाला ती माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांच्या कामगारांची ने-आण करणारी होती. हिंजवडीत माहिती तंत्रज्ञान कंपन्यांची संख्या अधिक असल्याने खासगी बस मालकांसाठी कामगारांच्या वाहतुकीचा धंदा बक्कळ पैसा मिळवून देणारा ठरला आहे. बस चालकांची नेमणूक त्यांच्याकडून जबाबदारीने व्हावी, ही अपेक्षा आताच्या दिवसांत पूर्ण होणारी नाही. किरकोळ अपघात झाला तर स्थानिक पोलिसांना पैसे देऊन गप्प करण्याचा मार्ग चालकांकडून वापरला जातो. कायद्याच्या अंमलबजावणीची ही तर्हा; मग पर्वा कुणाची?

भ्रष्ट यंत्रणांचे पाठबळ

माहिती तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये काम करणारे कर्मचारी उच्चशिक्षित. त्यांच्याकडून बसचालकांच्या नियमबाह्य वर्तनाकडे डोळेझाक होण्याचे कारण काय? आपल्या दुर्लक्षामुळे गंभीर अपघातांना निमंत्रण मिळू शकते, हा विचार त्यांच्या मनात येत नसेल? पण स्वतःपलीकडे पाहण्याची तसदी घेतली जात नाही. हिंजवडीत प्राण गमवावा लागलेली भावंडे भररस्त्यातून चालत नव्हती. पदपथावरून ते घराकडे परतत होते. बसने पदपथावर त्यांना चिरडले. त्या बसमध्ये २० ते २५ कर्मचारी होते. अपघातस्थळी आकांत माजला होता आणि हे सर्व कर्मचारी पळून गेले! मदतीला जाण्याची इच्छा देखील होऊ नये, ही माणूसपणाची नवी व्याख्या होऊ पाहात आहे. उच्च शिक्षण सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व घडवतेच असे नाही, याचे हे विदारक दर्शन होय. हिंजवडी आयटी पार्कमध्ये अवजड वाहनांमुळे होणारे अपघात नवीन नाहीत. अलीकडेच मारुंजी रस्त्यावर सिमेंट मिक्सरची धडक बसून रिदा खान या तरुणीचा मृत्यू झाला. लवळे फाट्यावर डंपरच्या धडकेत वैभव मालपोटे या दुचाकीस्वाराला प्राण गमवावे लागले. जानेवारी ते ऑक्टोबर, या दरम्यान 'ब्रेथ ॲनालयाझर' द्वारे झालेल्या तपासणीत ३ हजार २३८ मद्यपी वाहनचालकांवर कारवाई झाली. ही संख्या मोठी आहे. कर्तव्यनिष्ठेचा अभाव, आर्थिक हिताला प्राधान्य, यामुळे शासकीय यंत्रणा मद्यपी वाहनचालकांना रोखू शकत ना-हीत. अवजड वाहनांमुळे होणारे अप-घात रोखण्यासाठी थेट वाहन मालकांना जबाबदार धरण्याचा इशारा हिंजवडी पोलिसांनी नुकत्याच एका बैठकीत दिला. तो कृतीत येण्याची नागरिकांना प्रतीक्षा आहे. हिंजवडी अपघातातील चालकाने बसमध्येच मद्यपान केल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात कंपनीच्या अधिकार्यांची काहीच जबाबदारी नाही? सडलेल्या यंत्रणांएवढीच त्यांच्यावरही अपघाताच्या पापाची जबाबदारी येते. भोसरी, मोशी, चिखली, वाकड-चिंचवड भागातील भूमकर चौक, डांगे चौक असा मोठा परिसर खासगी कंपन्यांच्या कामगारांची वाहतूक करणार्या बसेसमुळे घेरला गेला आहे. त्यांची मनमानी वा-हतूक पोलिस, प्रादेशिक परिवहन विभाग यांच्याकडून रोखली जाणार नसेल आणि नागरिकांवर असुरक्षिततेची टांगती तलवार कायम राहणार असेल,

तर सामाजिक कार्यकर्ते, समाजाप्रति संवेदना असणारे वकील, नागरिक यांनाच पुढाकार घ्यावा लागेल. नियम गुंडाळून यमदूत ठरणार्यांचे प्रताप समाजमाध्यमांवर आणावे लागतील, समाजमाध्यमांवर आवाज उठवून त्यांच्यापासून नागरिकांना सावध करावे लागेल.

डाएटकट्टा । कमी खाण्यापेक्षा कमी वेळा खाल्ल्याने आजारांवर मात । डॉ.

## डॉक्टर टीप्स

### वैवाहिक जीवन सुधारण्यासाठी विशेष टिप्स



वैवाहिक जीवन आरोग्यासाठी चांगले मानले जाते. पण हे सुद्धा खूप आवश्यक आहे कि सेक्स चा आनंद घेण्यासाठी योग्य मार्ग जाणून घेतला पाहिजे. या लेखात दिलेल्या सोप्या टिप्स चा वापर करून तुम्ही तुमचे सेक्स लाइफ मध्ये सुधार आणू शकता.१. सेक्स कण्याआधी ओरल सेक्स करणे महत्वाचे आहे. ही क्रिया सेक्स मध्ये महत्वाची भूमिका बंजावते. या क्रियेमुळे तुम्ही सेक्स चा आनंद खूप चांगल्या प्रकारे घेऊ शकता. २. परुष असो किंव्हा स्त्री त्यांना या गोष्टीची माहिती हवी असली पाहिजे कि आपला पार्टनर खुश कशामुळे होतो. आणि ते सेक्स करताना कोणत्या क्रियेमुळे जास्त एन्जाँय करू शकतो.

## विनोद




**शिक्षक : गव्हाचे सगळ्यात जास्त उत्पादन कोठे होते?**

**विद्यार्थी : शेतात.**

## संदेश

Aik rikshaw ke peche likha tha k "SAWAN KA INTAZAR HAI"
Peche se aik truck aya or rikshaw ko oraa dia(hit kia) or us ke peche likha tha "AYA SAWAN JHOOM KE".

## सुविचार


**संधी या देवतेच्या डोक्यावर एकही केस नसतो.**
**- टेरेन्स**



### संस्कृत सुभाषित

**अप्राप्तकालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन्**
**लभते बुद्ध्यवज्ञानमवानं च भारत ।।**
(उद्योगपर्व, अध्याय ३९, ‍ैक २ महाभारत)
**अर्थ –**

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१. मागाहून, मग
३. कथांमधील भला मोठा नाग
६. सापाची एक जात
९. तळे, धरण, विहीर इ.
११. एक मंगल वाद्य
१३. वागणूक
१४. परमेश्वर
१५. मोठा डेरेदार वृक्ष
१८. विल्हेवाट, निकाल (लावणे)
१९. अंगावरील बारीक केस
२२. कबूतर
२३. चंद्र, एक वनस्पती
२५. मुलगा-मुलगी
२८. अत्यंत धनाढ्य मनुष्य
३२. काळ्या तोंडाचा हुप्प्या
३३. करसेवेचा अपभ्रंश – सेवा
३४. रोग झालेला, आजारी
३५. सारखा
३६. सदोदित
३७. चिवचिवाट
३९. हुबेहुब प्रत बनवणारा
४१. मांडणी, सजावट
४२. शुष्कता
४३. धुणे
४७. धुसफूस
४९. धातूचा धागा
५०. बुजणारी
५१. तारीख
५२. पद्धतीप्रमाणे
५३अ. पाणी
५४. मांडी न घालता बसलेला
५५. नेहमी, वारंवार
५७. खाट, चौपाई
५८. युवराज
६०. सापाची एक जात
६१. आपला नसलेला
६३. बातमीदार
६५. घोडागाडी
६६. धमकी
६७. त्रास, वैताग, बडबड
६९. पाठविलेला
७१. रवाळ
७३. मूळ आधार
७४. तिथीप्रमाणे बदलत जाणारा चंद्राचा आकार
७६. डोळे
७८. हाताचा तळवा
७९. पाप
८०. एकावर एक रचलेल्या वस्तू (उदा. गोवऱ्या, पुस्तके)
८१. पादत्राण

**उभे शब्द**

१. ठोंब्या माणूस, शंकराचे वाहन
२. दुलई
३. नष्ट
४. मृत
५. रमापती
६. जमीनदोस्त
७. तृण
८. द्रव्य, पैसा
१०. प्रेत (हिंदी)
१२. नूतन
१६. भारतीय चलन
१७. पाठवणी
२०. जमीनदार
२१. भूतकाळ
२३. सुविधा
२४. पाठीतील हाडांच्या माळेतील मणी
२६. पुरुष
२७. पाताळ
२९. न वापरलेला
३०. नसलेला
३१. श्रीरामाचे स्तोत्र
३२. गंध
३४. जाड पोळी
३७. तंबूची कापडी भिंत
३८. साखळी लावलेला दिवा
३९. बोटाच्या टोकावरील आवरण
४०. लक्षाचा आकडा
४२. तापापूर्वीचे शहारे
४४. वेल
४५. फार गार वा उष्ण नसलेले
४६. निर्लज्ज
४८. साठ मिनिटे
५०अ. ढग
५३. चापट, मऊ पदार्थाचा आघात
५४. पार्वती
५४अ. डुक्कर
५६. सुतळीच्या धाग्याचे कापड
५९. मदत
६०. संगीतातील एक राग
६१. झटकन
६२. मनोहरी, रम्य
६४. विरोध
६६. प्रत्येक, किंमत
६७. काळिमा, बट्टा
६८. डाक, पत्र
७०. श्वासाचा अवयव
७२. राक्षस
७५. लत्ताप्रहार
७७. जून्या जखमेची खूण

**आडवे उत्तर**

१.नंतर ३.नामकरण ६.भुजंग ९.जलाशय ११.सनई १३.वर्तन १४.ईश १५.तरुवर १८.वासलात १९.लव २२.पारवा २३.सोम २५.तनयतनया २८.नवकोटनारायण ३२.वानर ३३.कार ३४.रोगी ३५.सम ३६.सदा ३७.कलकलाट ३९.नकलाकार ४१.रचना ४२.रखरख ४३.क्षालन ४७.तणतण ४९.तार ५०.लाजरी ५१.दिनांक ५२.रीतसर ५३अ. जल ५४.उकीडवा ५५.सतत ५७.पलंग ५८.राजकुमार ६०.मणेर ६१.परका ६३३. वार्ताहर ६५.टमटम ६६.दम ६७.कटकट ६९.रवाना ७१.कणीदार ७३.पाया ७४.कला ७६.नयन ७८.करतल ७९.पातक ८०.थप्पी ८१.वहाण

**उभे उत्तर**

१.नंदीबैल २.रजई ३.नाश ४.मयत ५.रमावर ६.भुईसपाट ७.गवत ८.धन १०.लाश १२.नवा १६.रुपाया १७.रव-ानगी २०.वतनदार २१.गतकाल २३.सोय २४.मणका २६.नर २७.नरक २९.कोरा करकरीत ३०.नासका ३१.रामरक्षा ३२.वास ३४.रोट ३७.कनात ३८.लामणदिवा ३९.नख ४०.लाख ४२.रसकसणे ४४.लता ४५.नरमगरम ४६.निलाजरा ४८.तास ५०अ. जलज ५३.रपका ५४.उमा ५४अ.कीरवा ५६.तरट ५९.कुमक ६०.मरवा ६१.पटकन ६२.रमणीय ६४.हरकत ६६.दर ६७.कलंक ६८.टपाल ७०.नाक ७२.दानव ७५.लाथ ७७.व्रण



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### कोहली विजय हजारे ट्रॉफीत खेळणार! प्रत्येक सामन्यात मिळणार इतका मोबदला



मुंबई -विराट कोहलीने २४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे ट्रॉफीत खेळण्यासाठी अखेर हिरवा कंदील दाखवला आहे. कोहलीच्या या निर्णयामुळे क्रिकेटप्रेमींचा उत्साह वाढला आहे. आणि वाढायलाच हवाष्ठ कारण तब्बल अनेक वर्षानंतर विराट कोहली लिस्ट-ए घरगुती स्पर्धेत पुन्हा मैदानात उतरणार आहेत. अखेर विराट कोहलीनं या ट्रॉफीसाठी उपलब्ध असल्याची माहिती दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशनला कळवली आहे.विराट कोहली एका एकदिवसीय सामन्यासाठी ६ लाख कमवतो.विराट कोहलीने कसोटी आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. तो आता फक्त एकदिवसीय सामन्यांमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करतो, जिथे तो प्रत्येक सामन्यासाठी ६ लाख कमवतो. पण, जेव्हा तो स्थानिक स्पर्धा, विजय हजारे ट्रॉफी ५० षटकांच्या स्वरूपात खेळतो, तेव्हा तो प्रत्येक सामन्यासाठी किती कमाई करेल.

### टीम इंडियाला पहिला मोठा धक्का! रोहित शर्मा स्वस्तात परतला माघारी



नवी दिल्ली -भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना रांचीत पार पडला. या सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेवर दमदार विजयाची नोंद केली. मालिकेतील दुसरा वनडे सामना रायपूरच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. हा सामना जिंकून भारतीय संघ मालिकेत विजयी आघाडी घेण्याच्या प्रयत्नात असणार आहे.गेल्या सामन्यात अर्धशतकी खेळी करणारा रोहित शर्मा या सामन्यात १४ धावा करून माघारी परतला आहे.दक्षिण आफ्रिका (झश्रूळपस दख): क्विंटन डी कॉक(यष्टिरक्षक), एडन मार्करम, टेंबा बावुमा(कर्णधार), मॅथ्यू ब्रीत्झके, टोनी डी झोर्झी, डेवाल्ड ब्रेविस, मार्को यान्सन, कॉर्बिन बॉश, केशव महाराज, नांद्रे बर्गर, लुंगी एनगिडीभारत (झश्रू-ळपस दख): यशस्वी जैस्वाल, रोहित शर्मा, विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, वॉशिंग्टन सुंदर,

### पालथ्या घड्यावर पाणी! टॉस जिंकून साऊथ अफ्रिकेने थेट कॅप्टन बदलला पण केएलने चूक सुधारली नाही



नवी दिल्ली-भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना आज रायपूर येथे खेळला जाणार आहे. शहीद वीर नारायण सिंह स्टेडियमवर सामना दुपारी दीड वाजता सुरू होईल. भारताने रायपूरमध्ये कधीही एकदिवसीय सामना गमावलेला नाही. त्यामुळे टीम इंडिया विजयी घोडदौड सुरू ठेवणार का? असा सवाल विचारला जातोय. अशातच साऊथ अफ्रिकेने टॉस जिंकला असून पहिल्यांदा बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला आहे. टेम्बा बावुमा साऊथ अफ्रिकेचा कॅप्टन म्हणून संघात परत आलाय.वॉशिंग्टन सुंदरला पुन्हा संधी
पहिल्या वनडेमध्ये टीम इंडियाची बॅटिंग चांगली झाली पण बॉलिंगमध्ये बॉलर्सने खूर मार खाल्ला. खासकरून स्पिनर्सला चांगली कामगिरी करता आली नाही. अशातच आता प्लेइंग इलेव्हनमध्ये एक्ट्रा बॉलर आणण्याची शक्यता होती.

### चुकीला माफी नाही! हर्षित राणावर आयसीसीची मोठी कारवाई

नवी दिल्ली-विराट कोहलीच्या शानदार शतकाच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १७ रन्सने सामना जिंकला. या सिरीजमधील दुसरा मॅच आज रायपूर येथे होणार आहे. अशातच आता आयसीसीने टीम इंडियाचा बॉलर हर्षित राणा याच्यावर कारवाई केली आहे. भारताच्या युवा बॉलर हर्षित राणाने नुकत्याच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या वनडे सामनात केलेल्या एका कृतीमुळे त्याला आयसीसीच्या आचारसंहितेचा भंग केल्याबद्दल दंड ठोठावण्यात आला आहे.
आयसीसीच्या नियमांचे उल्लंघन
रांची येथे झालेल्या पहिल्या सामनात भारताने विजय मिळवला असला तरी, या विजयानंतर हर्षित राणाला आयसीसीच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल ताकीद मिळाली आहे. ही कारवाई आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडूंनी पाळावयाच्या शिस्तीचे महत्त्वाची असल्याचं आयसीसीने म्हटलं आहे. पण मॅचमध्ये काय झालं होतं? हा प्रसंग दक्षिण आफ्रिकेच्या डावातील २२ व्या ओव्हरमध्ये घडला. जेव्हा भारतीय पॅसर हर्षित राणा याने साऊथ अफ्रिकन फलंदाज डेवाल्ड ब्रेविस याला आऊट केलं.

# दक्षिण आफ्रिकेचा भारतावर ऐतिहासिक विजय

## मारक्रम-ब्रेविस-ब्रिट्झके यांची निर्णायक खेळी; विराट-ऋतुराजची शतकं ठरली व्यर्थ

नवी दिल्ली: भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा वनडे सामना देखील चांगलाच अटीतटीचा झाला.
दक्षिण आफ्रिकेच्या संघाने कडवी झुंज देत भारताविरूद्ध दुसऱ्या वनडे सामन्यात ४ विकेट्सने विजय मिळवला. संघाचे दोन खेळाडू सामन्यादरम्यान हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीने त्रस्त असतानाही संघातील इतर खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. मारक्रमचं शतक व यानंतर बावुमाच्या ४६ धावा आणि ब्रिट्झके-ब्रेविसच्या अर्धशतकी खेळींमुळे दक्षिण आफ्रिकेने हे लक्ष्य गाठलं. रायपूरमधील दवांनी देखील दक्षिण आफ्रिकेला चांगली साथ दिली, ज्यामुळे भारताच्या गोलंदाजीवरही परिणाम झाला.
दक्षिण आफ्रिकेच्या विजयामुळे वनडे मालिका १-१ अशी बरोबरीत आली आहे. यामुळे आता तिसरा वनडे सामना मालिकेच्या दृष्टीने महत्त्वाचा असणार आहे. ऑस्ट्रेलियानंतर वनडेमध्ये भारताविरूद्ध दक्षिण आफ्रिका ३५० अधिक



धावांचं लक्ष्य गाठणारा दुसरा संघ ठरला. दक्षिण आफ्रिकेच्या इतर संघांच्या घरच्या मैदानावरील वनडेमधील हा सर्वात मोठा विजय आहे, यासह दक्षिण आफ्रिकेचा हा विजय ऐतिहासिक ठरला.भारताने दिलेल्या ३५९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना संघाला लवकर धक्का बसला असला तरी मारक्रम व तेंबा बावुमाने संघाचा डाव सावरला.

एडन मारक्रमने ९८ चेंडूंत १० चौकार व ४ षटकारांसह ११० धावांची शतकी खेळी केली. आफ्रिकेच्या ३ फलंदाजांनी अर्धशतकी खेळी करत संघाला विजयाच्या उंबरठ्यावर आणून ठेवलं. याशिवाय कर्णधार तेंबा बावुमा ४८ चेंडूंत ३ चौकार व एका षटकारासह ४६ धावा करत बाद झाला.डेवाल्ड ब्रेविसने ३४ चेंडूत १ चौकार व ५ षटकारांसह ५४ धावा करत बाद झाला. तर मॅथ्यू ब्रिट्झकेने ६४ चेंडूत ५ चौकारांसह ६८ धावा केल्या. टॉनी दी झॉर्झीने सामन्यादरम्यान हॅमस्ट्रिंगचा त्रास झाला होता,
ज्यामुळे तो रिटायर्ड हर्ट होत मैदानाबाहेर गेला. गोलंदाजी करताना नांद्रे बर्गरलाही हॅमस्ट्रिंगचा त्रास झाल्याने तो सामन्यात पुन्हा उतरला नाही. टॉप-५ फलंदाजी फळीतील फलंदाजांनी उत्कृष्ट फलंदाजी केल्याने सामना अटीतटीचा झाला आणि त्यामुळे अखेरीस केशव महाराज व कार्बिन बॉश यांनी संघाला सहज विजय मिळवून दिला.

## टीम इंडियाला ४२ धावा महागात पडणार, गंभीरच्या हट्टाने पुन्हा शेवट....

रायपूर,३ डिसेंबर -रायपूरच्या मैदानावर रंगलेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाडच्या शतकीय खेळीच्या बळावर टीम इंडियाने ५ विकेट गमावून ३५८ धावा ठोकल्या आहेत.त्यामुळे साऊथ आफ्रिकेसमोर ३५९ धावांचे आव्हान आहे. पण भारत इतक्या मोठ्या धावा करून ४२ धावा कमी पडला आहे. हे फक्त आणि फक्त मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या हट्टामुळे घडलं आहे.त्यामुळे गंभीरच्या रणनितीवर टीका होते आहे.



खरे तर ज्या प्रमाणे विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाडने शतकीय खेळी केली ते पाहता भारत सहज ४०० पार पोहोचू शकला असता. पण गंभीरच्या त्या ऑलराऊंडर खेळाडूंना संघात घेण्याचा हट्टांमुळे भारत ५ विकेट गमावून ३५८ धावापर्यंतच मजल मारू शकली.
ऋतुराज आणि विराट कोहली बाद झाल्यानंतर भारताची धावसंख्या ही २८४ वर ४ बाद अशी होती.त्यावेळेस ३९ ओव्हर पार पडल्या होत्या. आता उतल्या फक्त ११ ओव्हर म्हणजेच ६६ बॉल होत्या. या ६६ बॉलमध्ये भारताने किमान १२० धावा करणे अपेक्षित होते. पण भारत फक्त ७४ तरच धावा जोडू शकला.कारण वॉशिंग्टन १ धावावर रनआऊट झाला, तर रविंद्र जडेजा २७ बॉल २४ धावाच करू शकला. तर राहुलने ४२ बॉल ६६ धावांची नाबाद खेळी केली. कर्णधार केएल राहुल, वॉशिंग्टन सुंदर आणि रविंद्र जडेजा हे तीन खेळाडू मोठ्या धावा करू शकले असते. पण हे खेळाडू खूपच हळू खेळल्यामुळे भारत ढकलंत ढकलंत ३५० धावा गाठू शकला.
गौतम गंभीर ज्या ऑलराऊंडर खेळाडूंवर जास्त भरोसा ठेवतो आणि संघाची बॅटींग लाईन मोठी करण्याचा प्रयत्न करत होता. तेच ऑलराऊंडर खेळाडू मोठ्या धावा करण्यात अपयशी ठरले. त्यामुळे भारत फक्त ३५८ धावाच करू शकली आणि ४०० धावा करण्याहून अवघ्या ४२ धावा दुर राहिली.त्यामुळे कदाचित या ४२ धावा टीम इंडियाला महागात पडण्याची शक्यता आहे.
दक्षिण आफ्रिका (प्लेइंग इलेव्हन): क्विंटन डी कॉक (ख), एडन मार्कराम, टेम्बा बावुमा (ण), मॅथ्यू ब्रेट्झके, टोनी डी झोर्झी, डेवाल्ड ब्रेविस, मार्को जॅन्सन, कॉर्बिन बॉश, केशव महाराज, नांद्रे बर्गर, लुंगी एनगिडी.
भारत (प्लेइंग इलेव्हन): यशस्वी जयस्वाल, रोहित शर्मा, विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, वॉशिंग्टन सुंदर, केएल राहुल (म), रवींद्र जडेजा, हर्षित राणा, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, प्रसिद्ध कृष्णा.

## विराट मैदानाबाहेर जाताच चमत्कार, टीम इंडियाच्या फ्लाईंग जटकडे मार्करही बघत राहिला

रायपूर-भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या रायपूर वनडेमध्ये तिलक वर्माने केलेल्या फिल्डिंगमुळे चाहत्यांना जॉन्टी ऱ्होड्स आठवला आहे. विराट कोहली ड्रेसिंग रूममध्ये गेल्यामुळे तिलक वर्मा फिल्डिंगसाठी मैदानात आला होता, तेव्हा त्याने बाऊंड्री लाईनवर ५ रन वाचवले. २० व्या ओव्हरच्या चौथ्या बॉलला कुलदीप यादवच्या बॉलिंगवर मार्करमने मोठा शॉट खेळला. बॉल बाऊंड्री लाईनच्या बाहेर जाईल असं वाटत होतं, पण तिलक वर्माने उंच झेप घेऊन कॅच पकडण्याचा प्रयत्न केला, पण आपण बाऊंड्री लाईनबाहेर असल्याचं समजताच तिलकने बॉल बाहेर फेकला. तिलकच्या या फिल्डिंगमुळे टीम इंडियाने ५ रन वाचवल्या. हे करण्यासाठी तिलक वर्माला एका सेकंदापेक्षाही कमी वेळ मिळाला.तिलक वर्माच्या या फिल्डिंगचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल



होत आहे. या कामगिरीबद्दल चाहते तिलकचं कौतुकही करत आहेत. उत्कृष्ट फिल्डिंग केल्यानंतर तिलक वर्मा पुन्हा एकदा ड्रेसिंग रूममध्ये गेला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बऊमा याने टॉस जिंकून टीम इंडियाला पहिले बॅटिंगला पाठवलं. यानंतर विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाडच्या शतकामुळे भारताने ५० ओव्हरमध्ये ५ विकेट गमावून ३५८ रन केले. ऋतुराज गायकवाडने १०५ तर विराट कोहलीने १०२ रनची खेळी केली. याशिवाय कर्णधार केएल राहुलने ६६ रनचं मोलाचं योगदान दिलं. ३ वनडे मॅचच्या या सीरिजमध्ये टीम इंडिया १-० ने आघाडीवर आहे, त्यामुळे सीरिजमधले आव्हान कायम ठेवण्यासाठी दक्षिण आफ्रिकेला दुसरी वनडे जिंकणं गरजेचे आहे.

## वर्ल्डकप २०२६ जर्सी रोहित-तिलकने केली लाँच

मुंबई-टी-२० विश्वचषक २०२६ ७ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. आगामी टी-२० वर्ल्डकप हा भारत आणि श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली खेळवला जाणार आहे. काही दिवसांपूर्वीच या स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. त्यानंतर, आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यादरम्यान भारतीय संघाचा डाव संपल्यानंतर, बीसीसीआयने टी-२० विश्वचषकासाठी टीम इंडियाची जर्सी लाँच केली आहे.भारताचा माजी टी-२० विश्वचषक विजेता कर्णधार रोहित शर्माला या स्पर्धेचा ब्रँड अँम्बेसिडर करण्यात आलं आहे, याची घोषणा आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी स्वत:केली होती. आता भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसऱ्या वनडे सामन्यातील इनिंग्स ब्रेकदरम्यान रोहित शर्मा व तिलक वर्मा यांनी भारताची नवी टी-२० जर्सी लाँच करण्यात आली. टीम इंडियाच्या टी-२० विश्वचषक २०२६ च्या जर्सीच्या कॉलरवर तिरंगा असणार आहे, तर पुढच्या बाजूला गडद निळ्या रंगाचे पट्टे असतील. तर हाताजवळ केसरी रंगाच्या बॉर्डर आहेत आणि त्याच रंगाने घ्ख्अ असं लिहिलेलं असणार आहे. तर खांद्यावर मआदिदासफ ब्रँडच्या त्या पांढऱ्या पट्ट्या असणार आहेत.टी-२० विश्वचषक ०२६साठी कशी असणार भारताची जर्सी?टीम इंडियाच्या या जर्सीवर दोन स्टार देखील आहेत, ज्याचा थेट अर्थ असा आहे की भारतीय संघाने दोनदा टी-२० विश्वचषक जिंकला आहे.

## संघात जागाच मिळाली नाही,दुसऱ्या वनडे दरम्यान टीम इंडियाच्या स्टार खेळाडूची तडकाफडकी निवृत्ती


रायपूर-रायपूरच्या मैदानावर सध्या भारत आणि साऊथ आफ्रिका यांच्यात दुसरा वनडे सामना खेळवला जात आहे. या सामन्या दरम्यान टीम इंडियाला मोठा झटका बसला आहे. कारण टीम इंडियाच्या स्टार खेळाडूने निवृत्ती घेतल्याची घटना घडली आहे. त्यामुळे हा खेळाडू नेमका कोण आहे? आणि त्याने अचानक निवृत्ती का घेतली? हे जाणून घेऊयात.
टीम इंडियाचा स्टार गोलंदाज मोहित शर्माने क्रिकेटच्या सर्व प्रकारच्या फॉरमॅटमधून निवृत्ती घेण्याची घोषणा केली आहे. मोहितने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून याबाबतची माहिती दिली आहे.मोहित शर्माने इंस्टाग्रामवर लिहिले की, ''आज, मनापासून, मी सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करतो. हरियाणाकडून खेळण्यापासून ते भारताची जर्सी घालून आयपीएलमध्ये खेळण्यापर्यंतचा हा प्रवास एका आशीर्वादापेक्षा कमी नव्हता. माझ्या कारकिर्दीचा कणा असल्याबद्दल हरियाणा क्रिकेट असोसिएशनचे खूप खूप आभार आणि अनिरुद्ध सरांचे खूप खूप आभार, ज्यांचे सतत मार्गदर्शन आणि माझ्यावरील विश्वासाने माझा मार्ग अशा प्रकारे घडवला की शब्दात वर्णन करू शकत नाहीत,असे मोहित शर्मा म्हणाला आहे.''बीसीसीआय, माझे प्रशिक्षक, माझे सहकारी, आयपीएल फ्रँचायझी, सपोर्ट स्टाफ आणि माझ्या सर्व मित्रांचे त्यांच्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल आभार. माझ्या पत्नीचे विशेष आभार, ज्यांनी नेहमीच माझ्या मन:स्थितीतील बदल आणि राग हाताळला आणि प्रत्येक गोष्टीत मला साथ दिली. मी खेळाला नवीन मार्गांनी सेवा



करण्यास उत्सुक आहे. खूप खूप धन्यवाद,असे शेवटी मोहित शर्माने लिहले होते.
मोहित शर्माने भारतासाठी शेवटचा सामना हा २०१५ साली खेळला होता. मोहितने भारतासाठी २६ एकदिवसीय सामने आणि आठ टी२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. तसेच उजव्या हाताच्या या वेगवान गोलंदाजाने एकदिवसीय सामन्यात ३१ बळी घेतले आहेत, तर टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात त्याने ६ बळी घेतले होते.
मोहित शर्मा पहिल्यांदा २०१३ मध्ये आयपीएलमध्ये प्रसिद्धीच्या झोतात आला होता.एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्जकडून खेळताना मोहितने १५ सामन्यांमध्ये २० विकेट्स घेतल्या. त्या हंगामात त्याच्या कामगिरीचे त्याला बक्षीस मिळाले आणि झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेसाठी त्याला एकदिवसीय संघात स्थान देण्यात आले. मोहितने या मालिकेत पदार्पण केले आणि दोन सामन्यांमध्ये तीन विकेट्स घेतल्या.
मोहितने २०१४ च्या विश्वचषकात ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी२० आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. त्याने आयपीएल २०१४ मध्ये १६ सामन्यांमध्ये २३ विकेट्स घेत पर्पल कॅप जिंकली होती.




## विराट असताना सुपरमॅनची काय गरज? कोहलीच्या ८४ व्या शतकावर दिग्गज क्रिकेटरची प्रतिक्रिया



रायपूर-भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात बुधवार ३ डिसेंबर रोजी वनडे सीरिजमधला दुसरा सामना खेळवला जातोय. रायपूरच्या स्टेडियमवर हा सामना सुरु असून यात टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने लागोपाठ दुसऱ्या सामन्यात शतक ठोकले. यापूर्वी विराटने रांची येथील सामन्यात सुद्धा शतकीय कामगिरी केली होती. विराटने बुधवारी रायपूरमध्ये ठोकलेले हे शतक त्याचे वनडे क्रिकेटमधील ५३ वे शतक ठरले तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये विराटचे हे ८४ वे शतक ठरले. या शतकानंतर दिग्गज क्रिकेटर सुनील गावसकर यांनी विराट कोहलीला सुपरमॅनची उपमा दिली.
रायपूरच्या शहीद वीर नारायण सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या सीरिजमधला दुसरा सामना आयोजित करण्यात आला. या सामन्याचा टॉस दक्षिण आफ्रिकेने जिंकला आणि त्यांनी प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला भारताला फलंदाजीचं आव्हान दिलं. यशस्वी जयस्वाल आणि रोहित शर्मा हे सलामी फलंदाज फार काळ मैदानावर टिकू शकले नाही. त्यानंतर मैदानात आलेल्या विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाडने दमदार फलंदाजी केली. यात आधी ऋतुराज गायकवाडने शतक ठोकलं. त्यानंतर विराट कोहलीने शतक पूर्ण केलं. विराटने ९३ बॉलमध्ये १०२ धावा केल्या. दरम्यान त्याने ७ चौकार आणि २ षटकार ठोकले. जबरदस्त फॉर्मात असलेल्या विराटची चर्चा सध्या जगभरात होतेय.
आता विराटची नजर ही २०२७ वनडे वर्ल्ड कप खेळण्यावर आहे. विराट सध्या टी२० आणि टेस्ट सामन्यातून निवृत्ती घेऊनफक्त वनडे फॉरमॅटमध्ये क्रिकेट खेळतोय. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सलग दोन शतकं झळकावून विराटने आपला जबरदस्त फॉर्म दाखवलाय.
काय म्हणाले सुनील गावसकर?
विराट कोहलीने लागोपाठ त्याचं भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सलग दुसऱ्यांदा शतक पूर्ण केलं तेव्हा दिग्गज क्रिकेटर सुनील गावसकर हे इंग्रजी कॉमेंट्री बॉक्समध्ये उपस्थित होते. विराटचं शतक पूर्ण झाल्यावर ते म्हणाले की, 'जेव्हा तुमच्याकडे विराट कोहली आहे मग सुपरमॅनची काय गरज?'
भारताची प्लेईंग ११:
यशस्वी जयस्वाल, रोहित शर्मा, विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, वॉशिंग्टन सुंदर, केएल राहुल (कर्णधार), रवींद्र जडेजा, हर्षित राणा, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, प्रसिद्ध कृष्ण
दक्षिण आफ्रिका ११ : क्विंटन डी कॉक, एडन मार्कराम, टेंबा बावुमा (कर्णधार), मॅथ्यू ब्रेट्झके, टोनी डी झोर्झी, देवाल्ड ब्रेव्हिस, मार्को जॅन्सन, कॉर्बिन बॉश, केशव महाराज, नांद्रे बर्गर, लुंगी न्गिडी

## ज्येष्ठ समाजवादी नेते साथी पन्नालाल सुराणा यांच्या निधनाबाबद्दल गुरुवारी लातुरात श्रद्धांजली सभेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** ज्येष्ठ समाजवादी नेते, विचारवंत, राष्ट्र सेवा दलाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष साथी पन्नालाल सुराणा यांचे २ डिसेंबर रोजी रात्री नळदुर्ग येथे निधन झाले. त्यानिमित्त लातूर येथे राष्ट्र सेवा दल आणि समाजवादी विचार परिवारातील समविचारी संघटनाच्या वतीने गुरुवारी ४ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता लातूर येथील बाबासाहेब परांजपे फाउंडेशन वाचनालय, क्रीडा संकुल येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.



या श्रद्धांजली सभेला समाजवादी विचार परिवारातील तसेच समविचारी संघटनाचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांनी एका प्रसिद्दी पत्रकाद्वारे केले आहे.

## महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतिम आरक्षण सोडत प्रसिध्दी

**लातूर/प्रतिनिधी :** याद्वारे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांनी आदेश क्रमांक राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४३/का-५दिनांक २४/१०/२०२५ व राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४३/का-५दिनांक २७/१०/२०२५ अन्वये आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. सदर कार्यक्रमानुसार आरक्षण सोडत दिनांक ११/११/२०२५ रोजी घेण्यात आले. सदर हरकती व सुचना दिनांक ११/११/२०२५ रोजी राज्य निवडणूक आयोग यांच्या मान्यतेसाठी पाठविले होते. तसेच राज्य निवडणूक आयोग यांची मान्यता क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.६६/का-५ दिनांक १३/११/२०२५ नुसार आज दिनांक ०२/१२/२०२५ रोजी अंतिम आरक्षण सोडत शासन राजपत्रात प्रसिध्दी करण्यात आले आहे.

करीता दिनांक ०३/१२/२०२५ रोजी महानगरपालिका मुख्य कार्यालय निवडणूक विभाग, क्षेत्रिय कार्यालय A B C व D या व मनपा संकेतस्थळ mclatur.org या संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी.

## थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी जप्ती मोहीमेस सुरुवात, नागरिकांनी तातडीने कर भरुन प्रशासनास सहकार्य करावे - आयुक्त श्रीमती मानसी



**लातूर/प्रतिनिधी :** मालमत्ता कर वसुली साठी महानगरपालिकेने अनेक वेळा कर सवलतीची योजना राबवली मात्र बऱ्याच मालमत्ताधारकांनी याकडे कानाडोळाच केला.त्यामुळे महानगरपालिकेने आता थेट धडक जप्ती मोहिमेला सुरवात केली आहे.त्याकरिता ८ पथक नेमण्यात आले आहेत.

लातूर शहर महानगरपालिकेमार्फत शहरातील प्रलंबित मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत मालमत्ता कराची थकबाकी ठेवणाऱ्या करदात्यांविरुद्ध कठोर पावले उचलून त्यांच्या मालमत्तांवर जप्ती व नळ खंडन कारवाई करण्यात येत आहे.

आज दि.३ डिसेंबर रोजी महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय सी अंतर्गत तीन नळखंडन करण्यात आले व तर ३ निवासी मालमत्तांचे जप्ती करण्यात आले तसेच क्षेत्रीय करायला ब तीन नळखंडन व ५ निवासी मालमत्तांचे जप्ती करण्यात आले आले. तसेच क्षेत्रीय कार्यालय अ अंतर्गत जप्ती मोहिमेअंतर्गत ८ निवासी मालमत्तांचे जप्ती करण्यात आले आले

थकीत कराच्या वसुलीसाठी मनपाकडून मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. जप्त केलेल्या मालमत्ताधारकांनी मुदतीत कर भरणा न केल्यास लिलाव प्रक्रिया करण्यात येणार आहे . त्यामुळे जप्तीसारखी कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी कर भरून मनपाला सहकार्य करावे,असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

# शीघ्र निदान आणि उपचारामुळे दिव्यांगत्वाचे प्रमाण कमी करणे शक्य - राहुल कुमार मीना

## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात





**लातूर/प्रतिनिधी :** दिव्यांगत्व टाळण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. शीघ्र निदान व उपचारामुळे दिव्यांगत्वाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे बालकांमधील दिव्यांगत्वाचे निदान करून त्यांना वेळीच उपचार उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. अंगणवाडीस्तरावर यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग कल्याण आयुक्तालय, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद, लातूर, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व दिव्यांगांच्या विशेष शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथील रुक्मिणी मंगल कार्यालय येथे आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेचे उद्घाटन श्री. मीना यांच्या हस्ते झाले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, महिला व बालकल्याणचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादवराव गायकवाड, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, माध्यमिक शिक्षण विभागाचे अधिक्षक मधुकर वाघमारे यांची उपस्थिती होती.

दिव्यांगत्वाला शारिरीक व्याधी न समजता सामाजिक दायित्व समजून दिव्यांगांचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. तसेच दिव्यांगत्व टाळण्यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक आहेत. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून दिव्यांगांनाही विविध संकेतस्थळांवर माहिती व लाभ ही मिळत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये १०० विशेष शिक्षकांना सामावून घेण्यात आले आहे. आता त्यांना विशेष प्रशिक्षण देण्याचा मानस आहे, असे श्री मीना म्हणाले.

प्रास्ताविकात जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्री. नाईकवाडी यांनी यंदाच्या वर्षात विविध उपक्रम राबवून ०३ ते ०९ डिसेंबर दरम्यान दिव्यांग सप्ताह साजरा होणार असल्याचे सांगून जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या सहाय्याने ट्रायसिकल व विविध दिव्यांगांना उपयुक्त साहित्य ही वाटप केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन बंकट पवार, व्यंकट लामजने, सिंधू इंगळे यांनी केले, तर डॉ. राजु गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून रंगकर्मी अश्लेषा वाकडे व अभिनव घोडके यांनी काम पाहिले. यशस्वीतेसाठी शिवाजी शिरडे, मोहन चव्हाण, बाळासाहेब वाकडे, डॉ. योगेश निटुरकर, बस्वराज पैके, विक्रम जाधव, राहुल काळे, शिवराज गायकवाड, वर्षा जोगदंड, विजय बुरांडे, अण्णासाहेब कदम, शिवप्रसाद भंडारे, गणेश पाटील, बालाजी बनसोडे, श्रीकांत उंबरे यांनी परिश्रम घेतले.

यंदाच्या वर्षात दिव्यांग दिनानिमित्त विशेष दिव्यांग थीम तयार करण्यात आली असून 'सामाजिक प्रगतीसाठी दिव्यांग- सर्वसमावेशक समाज घडविणे' ही विशेष बाब राहणार आहे. यात दिव्यांगासाठी स्वीकार व आदर, दया नव्हे मान-सन्मान, कौशल्य व क्षमतेला मान्यता देणे, समान संधी उपलब्ध करून देणे, शिक्षण, रोजगार व आरोग्य सेवा व सार्वजनिक वाहतुक यामध्ये भेदभाव न करता संधी देणे. यासह विविध दिव्यांगांप्रती सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. या थीमची माहिती विशेष शिक्षक व्यंकट लामजने यांनी दिली.

**दिव्यांग विद्यार्थ्यांनी सादर केला लक्षवेधी कलाविष्कार**

या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत जिल्ह्यातील ५७ दिव्यांगांच्या शाळांतील ३३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या या कलाविष्काराने रसिक मंत्रमुग्ध झालेच, याशिवाय दिव्यांगांच्या उत्कृष्ट कलाकृतीने मान्यवरांनाही मोहित केले. यात समुहनृत्य गायन, मुकनाट्य, वैयक्तिक नृत्य, लावणी, देशभक्तीपर गीत यांचा समावेश होता.

## दिव्यांगांच्या पदसुनिश्चितीसाठी तज्ज्ञ समितीची पुनर्रचना-सचिव तुकाराम मुंढे

### प्रक्रियेसाठी एकसमान कार्यपद्धती निश्चित

**मुंबई/प्रतिनिधी :** दिव्यांग व्यक्तींना शासकीय, निमशासकीय सेवेत नियुक्ती आणि पदोन्नतीमध्ये चार टक्के आरक्षणाचा कायदेशीर हक्क प्रभावीपणे मिळावा, यासाठी पदसुनिश्चिती प्रक्रियेसाठी एकसमान कार्यपद्धती (एसओपी) तयार केली आहे. पदसुनिश्चिती प्रक्रिया अधिक शास्त्रीय आणि पारदर्शक करण्याच्या हेतूने तज्ज्ञ समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो दिव्यांग उमेदवारांसाठी रोजगार, सर्व स्तरांवर समान संधी सुनिश्चित होण्यास मदत होणार असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.



सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पदसुनिश्चिती प्रक्रियेसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शासकीय, निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच स्वायत्त संस्था आणि महामंडळांमधील मंजूर पदांचा सखोल आढावा घेऊन दिव्यांग व्यक्ती कोणत्या पदांवर कार्यक्षमतेने काम करू शकतील, हे ओळखणे आता बंधनकारक राहणार आहे. प्रत्येक मंत्रालयीन विभागात यासाठी तज्ज्ञांचा समावेश असलेली समिती स्थापन करेल.

प्रत्येक मंत्रालयीन विभागाच्या या समितीत अंध-अल्पदृष्टी, श्रवणदोष, अस्थिव्यंगता, स्वमग्नता, विशिष्ट शिक्षण अक्षमता व मानसिक आजार अशा विविध प्रवर्गांतील किमान एका तज्ज्ञाचा समावेश असेल. समितीचे अध्यक्ष त्या विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव राहतील.

समिती सहाय्यक तंत्रज्ञानातील विकास, जागतिक रोजगार मानके आणि पदांच्या जबाबदारीचे स्वरूप लक्षात घेऊन विभागातील पदांची योग्यतापरीक्षण करण्यासोबतच पदसाखळीतील सर्व स्तरांचा विचार करून पदसुनिश्चिती प्रस्ताव सादर करणार आहे. दिव्यांगांसाठी सुयोग्य नसलेल्या पदांना सूट दिली जात असल्यास, ती जास्तीत जास्त तीन वर्षेच वैध राहणार असून त्याचे पुनरावलोकन अनिवार्य असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले.

सचिव मुंढे म्हणाले, प्रत्येक विभागाने दरवर्षी १ जानेवारी रोजी पदसुनिश्चितीची अद्ययावत स्थिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आणि तिची प्रत आयुक्त, दिव्यांग कल्याण तसेच दिव्यांग कल्याण विभागास सादर करणे बंधनकारक राहील. तसेच सरळसेवा भरती व पदोन्नती करताना संबंधित भरती यंत्रणेकडे तीन वर्षात एकदा पदसुनिश्चितीचा आढावा घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## महावितरण दिव्यांग कर्मचाऱ्यांना आत्मविश्वासाची ऊर्जा देणारी कंपनी- मुख्य अभियंता बुलबूले

### परिमंडळात साजरा झाला जागतिक दिव्यांग दिन



**लातूर/प्रतिनिधी :** महावितरण कंपनीतील मानव संसाधन विभागाची आजपर्यंतची कार्यपध्दती पाहिली तर असे दिसून येईल की, दिव्यांग असणारे कर्मचारी व इतर कर्मचारी यांच्या मध्ये भेदभाव न करता दिव्यांग कर्मचाऱ्यांमध्ये सातत्याने आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम केलेले आहे. आपण कंपनीच्या कामात कुठेही कमी पडणार नाही याचे आत्मभान महावितरण कंपनीने दिव्यांग कर्मचाऱ्यांना दिले असल्याचे विचार जागतिक दिव्यांग दिनाच्या प्रसंगी लातुर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबूले व्यक्त केले.

परिमंडळ कार्यालय येथे पार पडलेल्या कार्यक्रमात श्री बुलबूले बोलत होते. अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, मानव संसाधन विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक चेतन वाघ,उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर, वित्त विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक जालींदर मंगळवेढेकर व कार्यकारी अभियंता नागेश देशमूख यांच्या प्रमूख उपस्थितीत पार पडलेल्या कार्यक्रमात मुख्य अभियंता श्री बुलबूले म्हणाले की, दिव्यांग कर्मचाऱ्यांना काम करत असताना कमी पणाची भावना निर्माण होवू नये म्हणून विविध सेवा, सुविधा दिव्यांग कर्मचाऱ्यांना पुरविल्या आहेत. प्रमोशन देत असताना विशेष काळजी घेत ते त्यांच्या मुलभूत हक्कांपासून वंचीत राहणार नाहीत याची काळजी महावितरण प्रशासनाकडून घेतली जाते. मुख्य अभियंता ते लिपिक पदावर कार्यरत असणारे दिव्यांग कर्मचाऱ्यांनीही महावितरणने टाकलेला विश्वास सार्थ ठरवत निर्णायक कामे केलेले आहेत. दिव्यांग कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी लिलया पेलली आहे. याप्रसंगी अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी यांनी मनोगत व्यक्त करत दिव्यांग कर्मचाऱ्यांना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनातील प्रत्येक बाबीमध्ये भेडसावणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने जगभरात प्रत्येक वर्षी दि. ०३ डिसेंबर हा ''जागतिक दिव्यांग दिन'' म्हणून साजरा करण्यात येतो.

दिव्यांग व्यक्तीला आरोग्याच्या समस्या, शिक्षणातील समान संधींचा अभाव आणि बऱ्याचदा कामात होणारा त्रास यांचा सतत सामना करावा लागतो, यामुळे त्याच्या जीवनशैलीवर तसेच शारीरिक आरोग्यावर ही परिणाम होतो. म्हणूनच जगाला त्याच्या समस्यांबद्दल जागृत करण्यासाठी आणि त्यांच्यासाठी समाजात पूरक वातावरण निर्मिती करण्यासाठी दिव्यांग दिन साजरा करण्यात येत असल्यांचे श्री दाणी यांनी सांगीतले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री महेंद्र चुनारकर यांनी केले.या कार्यक्रमास दिव्यांग अधिकारी वित्त विभागाचे व्यवस्थापक आनंद गंजी, लिपिक हणमंत वैद्य, सहाय्यक लेखापाल गणेश भुतडा तसेच व्यवस्थापक रोहीत चव्हाण, कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी सिध्दार्थ कुसभागे, प्रशांत जानराव, अमित नाचणे लेखा उपव्यवस्थापक विकास मिश्रा यांची प्रामूख्याने उपस्थिती होती.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची विकास को-ऑपरेटिव्ह ॲग्रो इंडस्ट्रीजच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली भेट

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांची विकास को-ऑपरेटिव्ह ॲग्रो इंडस्ट्रीज, लातूरच्या चेअरमनपदी निवड झालेले गोविंद देशमुख आणि व्हाईस चेअरमनपदी निवड झालेले चंद्रकांत टेंकाळे व सर्व संचालकांनी आशीयाना निवासस्थानी भेट घेतली. यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी या सर्वांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विकास को-ऑपरेटिव्ह ॲग्रो इंडस्ट्रीजचे संचालक सर्वश्री महेद्र मुळे, भैरवनाथ सवासे, इश्वरप्रसाद चांडक, मंगल बोराडे, लता मुमाने, पंडीत कावळे, रमेश थोरमोटे आदी उपस्थित होते



## हास्य जत्रा फेम अभिनेत्री विशाखा सुभेदार यांच्या हस्ते नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद जिल्हा शाखा लातूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी दोन वाजता हास्यजत्रा फेम अभिनेत्री विशाखा सुभेदार यांच्या विशेष उपस्थितीत दगडोजीराव देशमुख नाट्यगृह, मार्केट यार्ड लातूर याठिकाणी संपन्न होणार आहे.

याप्रसंगी माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे. या वर्षीच्या स्पर्धेत एकूण २८ संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यामध्ये हैद्राबाद, पुणे, मुंबई, ठाणे, जालना, परभणी, लातूर, सोलापूर आदी ठिकाणच्या संघांनी एकांकिका सादर केल्या. विजयी संघांना अखिल भारतीय



नाट्य परिषदेच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ अभिनेत्री विशाखा सुभेदार अभिनित दि दमयंती दामले या कौटुंबिक विनोदी नाटकाचा प्रयोगही खास लातूरकराच्या आग्रहास्तव नाट्य रसिकांसाठी गुरुवारी रात्री ९ वाजता दगडोजीराव देशमुख सभागृह लातूर येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास नाट्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन नाट्य परिषदेचे लातूर जिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, कार्यवाह धनंजय बेंबडे, समन्वयक अविष्कार गोजमगुंडे, अजय गोजमगुंडे, कोषाध्यक्ष अमोल नानजकर, कल्याण वाघमारे, एड. राणीताई स्वामी, अरुण बारस्कर, बालाजी सूळ, संतोष साळुंके, अनिल कांबळे, उमाकांत हुरदुडे , राजू गड्डीमे , सुधन्वा पत्की आदिंनी केले आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# आधुनिक तंत्रज्ञानाधारे शेती अन् पीक पद्धतीबाबत शेतकऱ्यांना दिले धडे



परंडा   परंड्यात पाणी फाउंडेशनच्या 'सत्यमेव जयते फार्मर कप'चे शेतकरी प्रशिक्षण संपन्न झाले. कृषी विभाग, आत्मा व पाणी फाउंडेशन यांच्या विद्यमाने 'सत्यमेव जयते फार्मर कप' उपक्रमांतर्गत परंडा येथे शनिवारी (दि. २९) शेतकरी प्रशिक्षण उत्साहात पार पडले. गटशेती, फार्मर कप व शेतीविषयक विषयांवर आधारित या प्रशिक्षणाला तरुण शेतकरी, प्रगतिशील शेतकरी, कृषी ताई, कृषी सखी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे यांनी केले. त्यांनी 'फार्मर कप' उपक्रमाची माहिती देत त्यामागील उद्दिष्टांची रूपरेषा मांडली. फार्मर कपची संकल्पना काय व त्यासाठी आपली वाटचाल कशी असावी? याबद्दल मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात पाणी फाउंडेशनचे सुशांत गायकवाड, वैभव सुरवसे, प्रतीक्षा आसबे यांनी फार्मर कप स्पर्धेचे नियम व गट शेती या विषयांवर मार्गदर्शन केले. सत्यमेव जयते फार्मर कपमुळे गावागावात गट शेतीच्या नव्या चळवळीला प्रोत्साहन मिळत असून, या प्रशिक्षणामुळे फार्मर कप स्पर्धेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व सामूहिक गट शेतीचे फायदे कळणार असल्याचे त्यांनी सांगितले. परंडा तालुक्यातील सर्व मंडळ कृषी अधिकारी, सर्व उप कृषी अधिकारी, सर्व सहायक कृषी अधिकारी, आत्मा या संपूर्ण टीमने अतिशय चांगल्या पद्धतीने नियोजन करून यशस्वीरित्या हे प्रशिक्षण पार पाडले. या वेळी मंडल कृषी अधिकारी, परंडा संभाजी माळी, मंडळ कृषी अधिकारी, अनाळा जयाजी भोसले उपस्थित होते. प्रशिक्षणात १४२ शेतकऱ्यांची उपस्थिती तालुक्यातील निवडक शेतकऱ्यांसाठी आयोजित तीन दिवसीय निवासी प्रशिक्षणाबाबतही माहिती देण्यात आली. कार्यक्रमात कृषी विभागाचे महाविस्तार एआय ॲप डाऊनलोड व वापराबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सदर शेतकरी प्रशिक्षणासाठी १४२ शेतकरी व ३२ अधिकारी उपस्थित होते.

# जनतेचा थंडीत व्यायामाबरोबरच योग प्राणायामकडे कल



गुंजोटी(प्रतिनिधी)–आरोग्य हीच संपत्ती असून, निरोगी आरोग्य ठेवणे व चांगल्या आरोग्यासाठी हिवाळ्यातील पहाटेचे दिवस महत्त्वाचे मानले जातात. सध्या गुंजोटीसह परिसरात कडाक्याची थंडी असली तरी पहाटे मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्यांची संख्या कमी नाही. महिला, पुरुष, तरुण मोठ्याप्रमाणात गुंजोटी उमरगा रस्त्यावर पहाटेपासूनच मॉर्निंग वॉकसाठी दिसतात.

जलद चालणे, जलद धावत असतात. चालल्यानंतर सर्व ज्येष्ठ एकत्र येत द्वारकानगरी येथे योग प्राणायाम, ध्यान धारणा करतात. अलीकडील काळात बदलती जीवनशैली, विविध आजारांचे वाढते प्रमाण, शरीराकडे व आरोग्यकडे होत असलेले दुर्लक्ष अकाली मृत्यूचे कारण ठरत आहे. रक्तदाब, मधुमेह यासारखे आजार तर सामान्य झाल्यासारखे दिसत आहेत.

त्यामुळे हिवाळ्यात पहाटेचे फिरणे आणि योग प्राणायाम करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. दिवसभराच्या धावपळीतून स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ काढणे काळाची गरज झाली आहे. हिवाळ्यातील पहाटेचे हवामान, व्यायामासाठी आणि योग प्राणायामसाठी उत्तम असल्याने नागरिकांची गर्दी वाढत आहे. महिला, पुरुष, तरुण, वृद्ध टोपी, मफलर, स्वेटर घालून पहाटे फिरण्यासाठी येत असल्याचे चित्र आहे. येथील द्वारका नगरीत योगा, प्राणायाम करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढताना दिसत आहे.

मानवी जीवनात फिरणे, योग, प्राणायाम, व्यायाम काळाची गरज सध्याचे जग हे धावपळीचे झाले आहे. या धावपळीच्या युगात माणसाला आपल्या शरीराकडे लक्ष द्यायला वेळ नाही. खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये प्रचंड बदल झालेला आहे. आधुनिक जगात यांत्रिकीरणामुळे शारीरिक श्रम कमी झाले. कष्टाची, ओझ्याची कामे कमी झाली, घरातील महिलांचाही कामे देखील सोपी झाली. त्यामुळे वजन वाढणे, लठ्ठपणा, मधुमेह, हृदयरोग यासारख्या आजारांच्या रुग्णसंखेत वाढ झाली. फळे, पालेभाज्या, धान्य यावर औषधांचा भडिमार, खतांचा अतिप्रमाणात वापर यामुळे त्याचा शरीरावर परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत औषधाबरोबर पहाटेचे चालणे, धावणे, योग, प्राणायाम व व्यायाम हाच सर्वोत्तम उपाय असल्याचे डॉक्टर सल्ला देतात.

# तुळजापुरात मतदानात गेल्या वेळीपेक्षा ५ टक्के घट

तुळजापूर नगरपालिकेसाठी ८०.२४ टक्के मतदान झाले असून, गेल्या वेळीपेक्षा या वर्षी पाच टक्के मतदान कमी झाले आहे. मागे २०१६ मध्ये ८५.५७ टक्के मतदान झाले होते. मतदानाची घसरलेली टक्केवारी कोणाचा पथ्यावर पडणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. बहुतांश प्रभागात क्रॉस व्होटिंग झाल्याची चर्चा असून, यामुळे नगराध्यक्ष पदाचा निवडणुकीत चुरस निर्माण झाली आहे. या शिवाय सर्वात लहान असलेल्या प्रभाग क्र. १० सह प्रभाग पाच व प्रभाग आठमध्ये अनपेक्षित निकालाची शक्यता आहे.

नगरपालिकेचा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. २) मतदान प्रक्रिया पार पडली. नगराध्यक्षाचा सात उमेदवारांसह नगरसेवकपदाचा ५८ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. बोचऱ्या थंडीत ही सकाळी लवकरच मतदार बाहेर पडले. सर्वच मतदान केंद्रावर दिवसभर मतदारांची गर्दी होती. पहिल्या दोन तासात सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत ११.९६ टक्के; सकाळी ११:३० पर्यंत २९.८७ टक्के; दुपारी दीड वाजेपर्यंत ४७.९७ टक्के तर दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ६४.४२ टक्के एवढे मतदान झाले होते. तर सायंकाळी ०५:३० पर्यंत ८०.२४ टक्के एवढे मतदान झाले आहे. बहुतांश मतदान केंद्रावर वेळेत मतदान पार पडल्याचे निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे. एकूण मतदान २९५६१ झालेले मतदान २३७३३ पुरूष ११९२६ स्त्री ११८० इतर ०४

घसरलेली टक्केवारी कुणाचा पथ्यावर गतवेळचा तुलनेत यावेळी पाच टक्के कमी मतदान झाले आहे. ८०.२४ टक्के एवढे मतदान झाले असून, गेल्या वेळीपेक्षा २०१६ सालचा नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत ८५.५७ टक्के एवढे मतदान झाले होते. ५ टक्के मतदान कमी झाले असून, मतदानाचा घसरलेला टक्का कोणाचा पथ्यावर पडणार? याचा राजकीय पंडित किस पाडत आहेत.

विनोद गंगणे व अमर मगर यांचात लढत नगराध्यक्ष पदासाठी एकूण ०७ उमेदवार रिंगणात असले तरी भाजपचे विनोद गंगणे व महाविकास आघाडीचे अमर मगर यांचात थेट लढत असणार आहे. प्रभाग क्र. ११ सह शहरातील अनेक भागात क्रॉस व्होटिंग झाल्याची चर्चा आहे. याशिवाय यावेळी मतदारांनी शेवटपर्यंत दोन्ही उमेदवारांना झुलवत ठेवल्याने अंदाज लावणे कठीण झाले असून निकालाची प्रतिक्षा करावी लागणार आहे.

मतदान केंद्रावर तणाव; किरकोळ बाचाबाची शहरातील प्रभाग क्रमांक–दहा नगरपालिका कार्यालय, प्रभाग क्रमांक नऊ– जिल्हा परिषद मुलांची शाळा, प्रभाग क्रमांक चार – जिल्हा परिषद कन्या प्रशाला आदी मतदान केंद्रांवर दिवसभर तणाव होता. तर प्रभाग क्रमांक दोन हाडको, नगरपालिका कार्यालय व जिल्हा परिषद मुलांची शाळा आदी मतदान केंद्रावर किरकोळ बाचाबाची झाली.

# नळदुर्ग येथे मतदानासाठी तरुणांसह ज्येष्ठांचाही सहभाग



नळदुर्ग (प्रतिनिधी)– नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मंगळवारी मोठ्या उत्साहात व शांततेत ७२.५३ टक्के मतदान झाले. या वेळी एकूण १७१२२ मतदारांपैकी १२४१९ एवढे मतदान झाले आहे. मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. युवकांबरोबरच ज्येष्ठ नागरिकांनीही मतदान करून आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

मतदान पार पडल्यानंतर नगराध्यक्ष व नगरसेवकांचे भावितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले आहे. २०१६ मध्ये झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत ७१.५५ टक्के मतदान झाले होते. त्याच्या तुलनेत या निवडणुकीत एक टक्का मतदान वाढले. दि. २१ डिसेंबर रोजी मतमोजणी झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. मतदान सुरू असताना आमदार राणाजगजितसिंह पाटील, काँग्रेसचे नेते व नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अशोक जगदाळे, भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बसवराज धरणे, एमआयएमचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शहेबाज काझी, राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संजय बताले यांनी मतदान केंद्राना भेटी देऊन पाहणी केली. त्याचबरोबर नगरसेवक पदाचे उमेदवारही आपापल्या मतदान केंद्रावर उपस्थित राहून मतदारांकडून मतदान करून घेत होते. ही निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड सहायक निवडणूक निर्णय अधिकारी रामकृष्ण जाधवर त्यांच्या टीमने परिश्रम घेतले. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आजारी, दिव्यांग, तसेच ज्येष्ठ नागरिकांना मतदान करण्यासाठी त्यांच्या घरी जाऊन त्यांचे मतदान करून घेण्यात आले होते. मात्र नगरपालिका निवडणुकीत ही प्रक्रिया राबवण्यात आली नाही. त्यामुळे काही आजारी, वृद्ध, दिव्यांग मतदार मतदानापासून वंचित राहिले आहेत. त्याबद्दल अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन यादव, सहायक पोलिस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके, आनंद कांगुणे, पोलिस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे, संतोष गीते व पोलिस कर्मचाऱ्यांनी शहरातील २० मतदान केंद्रावर कडक पोलिस बंदोबस्त लावला होता.

# रस्त्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन मारहाण

शिराढोण (प्रतिनिधी)–पोलीस ठाणे अंतर्गत दिगंबर रा. खामसवाडी ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.०१.१२.२०२५ रोजी छत्रपती संभाजेराजे चौक व डॉ बाबासाहेब आंबेडकर पतसंस्थाच्या समोर खामसवाडी येथे फिर्यादी मनोज रावसाहेब गर्जे, वय ५५ वर्षे, रा.खामसवाडी ता. कळंब जि. धाराशिव यांना नमुदांनी रस्त्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काठीने मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याच धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी –मनोज गर्जे यांनी दि.०२.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे शिराढोण येथे गुन्हा नोंदवला आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

# शेतकरी, मजूर, वंचितांच्या हक्कांसाठी लढणारे व्यक्तिमत्व हरपले: अजित पवार

मुंबई (प्रतिनिधी)– ज्येष्ठ समाजवादी नेते, दैनिक मराठवाडाचे माजी संपादक पन्नालाल सुराणा यांच्या निधनाने भूमिहीन शेतकरी, मजूर, वंचितांच्या हक्कांसाठी लढणारे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, जुना समाजवादी पक्ष,जनता पक्ष, अनेक पुरोगामी संघटना आणि जन आंदोलन यांच्या उभारणीमध्ये पन्नालाल सुराणा यांचा मोठा वाटा होता. 'चले जाव' आंदोलनापासून ते स्वातंत्र्य चळवळीपर्यंत, त्यानंतर स्वातंत्र्य ते आणीबाणी आणि त्यानंतर देशाच्या सामाजिक,राजकीय स्थित्यंतराचे ते साक्षीदार होते. मराठवाड्यात भूकंपात सर्वस्व गमावलेल्यांसाठी त्यांनी सुरू केलेल्या 'आपलं घर' मधून अनेक मुला– मुलींची आयुष्य घडली आहेत.

पन्नालाल सुराणा यांच्या निधनाने समाजवादी चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे. पर्यावरण आणि जलसंधारणाच्या क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे.सामाजिक न्यायासाठी त्यांचा लढा कायम स्मरणात राहील. त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पन्नालाल सुराणा यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# समाजकारण– राजकारणातील निस्पृहतेचा आदर्श काळाच्या पडद्याआड – देवेंद्र फडणवीस

मुंबई, (प्रतिनिधी)– महाराष्ट्रातील समाजकारण– राजकारणातील निस्पृहतेचा आदर्श काळाच्या पडद्याआड गेल्याची शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ विचारवंत, समाजसेवक पन्नालाल सुराणा यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात,'सुराणा यांनी शेवटच्या श्वासापर्यंत समाजसेवेचा वसा जपला. त्यांनी राजकीय क्षेत्रातही आदर्शवाद जोपासला. शेती, शेतकरी यांच्यासह पर्यावरण रक्षण, जलसंधारण यांच्यासाठी ते अखेरपर्यंत व्रतस्थपणे कार्यरत राहीले. नळदुर्ग येथील 'आपलं घर' बालगृह व शाळेच्या माध्यमातून त्यांनी शेकडो अनाथ मुलांच्या आयुष्यात नवसंजीवनी आणली. त्यांची निस्पृह आणि आदर्श अशी जीवनशैली समाजकारण – राजकारणातील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

ज्येष्ठ समाजसेवक पन्नालाल सुराणा यांचे निधन महाराष्ट्राच्या समाजकारण राजकारण क्षेत्राची हानी आहे, अशी भावना व्यक्त करून मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सुराणा यांचे कुटुंबीय तसेच कार्यकर्ते यांच्याप्रती संवेदना व्यक्त केली आहे. आपण या सर्वांच्या दुःखात सहभागी असल्याचे नमूद केले आहे.


## Name of change  Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : KURESHI AHMED ALI   TO: AHMEDALI FAZLEHAQUE QURESHI
Hence for this Declaration i will be known by this name and will use KURESHI AHMED ALI  in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :-  KURESHI AHMED ALI
NEW NAME :- AHMEDALI FAZLEHAQUE QURESHI
Address - Kureshi Galli Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar n.- 940717500741  Mob.8142274497

---

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : QAZI ZULFIKHAR ALI MOHAMMED AYUB   TO: ZULFIQARALI QAZI
Hence for this Declaration i will be known by this name and will use QAZI ZULFIKHAR ALI MOHAMMED AYUB in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :-  QAZI ZULFIKAR ALI MOHAMMED AYUB
NEW NAME :- ZULFIQARALI QAZI
Address - 196 Ambedkar Nagar Majrewadi Taluka Solapur North DIST. Solapur. -413005
Adhar n.-946857156188    Mob.8888085844

---

## Name of change  Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : KAZI QAMARUZAMA URF ATTA UR RAHIMAN MOHAMMAD AYUB   TO: KAMARUZAMA KAZI
Hence for this Declaration i will be known by this name and will use KAZI QAMARUZAMA URF ATTA UR RAHIMAN MOHAMMAD AYUB in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :-  KAZI QAMARUZAMA URF ATTA UR RAHIMAN MOHAMMAD AYUB
NEW NAME :- KAMARUZAMA KAZI
Address - 196 Ambedkar Nagar Majrewadi Taluka Solapur North DIST. Solapur. -413005
Adhar n.-744764148786   Mob.9975475346



सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur.   Editor : Dayanand Shankar Jade   Mob:9422472502   RNI- MAHMAR/2003/11649